cmyk

## संपादकीय

### राजकारणाच्या गुन्हेगारीवर शिक्कामोर्तब !

पुण्यातील गुंड नीलेश घायवळ याचे पलायन व त्याला राजकारण्यांकडून मिळालेली प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत यामुळे राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुण्यात मारणे, आंदेकर यांच्याप्रमाणे घायवळ टोळीही कुप्रसिद्ध आहे. मागच्या काही दिवसांत ही घायवळ गँग राजकारण व गुन्हेगारीच्या पटलावर चांगलीच प्रकाशझोतात आल्याचे दिसून येते. या गँगशी बहुतांश पक्षातील नेते या ना त्या निमित्ताने कनेक्टेड असणे, हे आजचे राजकारण कुठल्या दिशेने चालले आहे, याचेच गमक.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१६६ | रविवार, दि.१२ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### बोगस दिव्यांगांना आता थेट घरचा रास्ता

नवी मुंबई : दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमानुसार दिव्यांग आरक्षणांतर्गत राज्यातील शासकीय आणि निमशासकीय व इतर सर्व संस्थांमध्ये पदभरतीसाठी दिव्यांगाचे ओळखपत्र आता अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील आस्थापनांवरील दिव्यांग अधिकारी व कर्मचा-यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करून त्याचा अहवाल विभागांनी ३ महिन्यांत दिव्यांग कल्याण विभागास सादर करावा, असे निर्देश दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिले.

# कापूस खरेदीला १५ ऑक्टोबरचा मुहूर्त!

## ८ हजार ११० रुपयांचा हमीभाव, सव्वातीन लाख शेतकऱ्यांनी केली सीसआय मध्ये नोंदणी

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील ३ लाख २५ हजारांहुन अधिक कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी घसरलेल्या बाजारभावामुळे हमीभावावर म्हणजेच ८ हजार ११० रुपये प्रति क्विंटल दराने कापूस विक्रीसाठी सीसीआय मध्ये नोंदणी केली आहे. केंद्र सरकारच्या कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत १५ ऑक्टोबरपासून खरेदी सुरू होणार असून, यासाठी 'कपास किसान' ॲपद्वारे नोंदणी बंधनकारक आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या माहितीची पडताळणी कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र तांत्रिक अडचणींमुळे काही शेतकऱ्यांना अडचणी येत असल्याच दिसून येत आहे.**



कापूस हे राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. कापूस या नगदी पिकाकडे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा मोठा कल असून, कापसाला योग्य भाव मिळावा यासाठी शेतकरी आणि शेतकरी संघटना नेहमीच आग्रही असतात. कापसाचे बाजार भाव निश्चित नसल्याने शेतकऱ्यांना नेहमीच अडचणी येते. दरवर्षी सरकार हा विभाग जाहीर करते मात्र बाजार भाव मी भाव पेक्षा कधी कमी येतो तर कधी जास्त असतो. यामुळे शेतकऱ्यांना निर्णय घेण्यासाठी अडचण येते. त्यात सरकारचे कापूस बाबतीत असलेले धोरण नेहमीच बदलत राहिले आहे, त्यामुळे विरोधकांकडून सरकारवर नियमित टीका झाली आहे. यंदा महाराष्ट्र मध्ये कापूस लागवड कमी झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे. त्यात राज्यामध्ये विशेष करून मराठवाड्यामध्ये अतिवृष्टी झाल्याने, कापूस उत्पादनात मोठी घट येईल असा अंदाज आहे. आता नवा कापूस शेतकऱ्यांच्या हाती येत असून, त्याला काय भाव मिळतो याकडे लक्ष आहे मात्र शासनाने सध्या ८ हजार ११० रुपये हवी भाव दिला आहे. कापसाच्या चालू बाजारभावात घसरण झाल्याने शेतकरी हमीभावाच्या खरेदीवर अवलंबून आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाला योग्य भाव मिळण्याची आशा आहे. यंदा सीसीआयने शेतकऱ्यांसाठी 'कपास किसान' नावाचे नवीन ॲप सुरू केले आहे, ज्याद्वारे शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी नोंदणी करावी लागते. सुरुवातीला काही अडचणी आल्या असल्या, तरी आता नोंदणी प्रक्रियेला गती मिळाल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. देशभरात २० लाख शेतकऱ्यांनी या ॲपद्वारे नोंदणी केली असून, त्यापैकी ३ लाख २५ हजार नोंदण्या एकट्या महाराष्ट्रातून ▶▶ पान २ वर

## राज्यातील शाळांची सुरक्षा ऐरणीवर; न्यायालयाने दिले निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी राज्य सरकारने निश्चित केलेले उपाय योजण्याची कार्यवाही सुरू झाली असली, तरी अंमलबजावणी खऱ्या अर्थाने सुरू आहे का, हेही तपासणे आवश्यक आहे, असे मत मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी व्यक्त केले. त्यानुसार, शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी राज्यभरात विविध ठिकाणच्या शाळांमध्ये आकस्मिक तपासणी करून खातजरमा करावी, असे तोंडी निर्देशही न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने दिले. माहिती १५ ऑक्टोबरपर्यंत अपलोड करणे बंधनकारक आहे.

'राज्यभरातील एक लाख आठ हजार १५९ शाळांपैकी सुमारे ८८ हजार शाळांनी सरकारच्या जीआरमध्ये नमूद केलेल्या उपायांपैकी किती उपाय केले आणि किती बाकी आहेत, याविषयीची माहिती शिक्षण विभागाच्या पोर्टलवर अपलोड केली आहे. त्यानुसार ▶▶ पान २ वर

### न्यायालयाच्या सूचना

'पालकांना माहितीविषयी काही शंका असल्यास कुठे विचारणा करावी? याविषयी अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसिद्ध करण्याचा विचार करावा. तसेच पोर्टलची माहिती वृत्तपत्रांमधील जाहिरातींच्या माध्यमातून तसेच वेबसाइटवर व शाळांच्या परिसरात कायमस्वरूपी दर्शनी भागांत ठळक फलकांद्वारे पोहोचवावी', असे निर्देशही खंडपीठाने सरकारला दिले.

## संभाजीनगरमध्ये हंबरडा मोर्चातून उद्धव ठाकरेंची सरकारवर टीका

### ५० खोके घेणाऱ्यांकडे ५० हजार हेक्टरी मागतो

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्यात अतिवृष्टी आणि महापुराने मोठे नुकसान झाले. पण सरकारची भरपाईची रक्कम तुटपुंजी असल्याची ओरड सुरू आहे. त्याविरोधात आज छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेनेने हंबरडा मोर्चा काढला. गुलमंडी येथे उद्धव ठाकरे यांनी सभेला संबोधित करताना महायुती सरकारवर आसूड ओढला. त्यांच्या शाब्दिक चाबकाच्या फटका-यांनी सभेत जान आणली. त्यांनी सरकारला शेतक-यांचा सातबारा कोरा करण्याची ▶▶ पान २ वर



### मदतीची घोषणा ही सर्वांत मोठी थाप

३१ हजार कोटींचे पॅकेज. इतिहासातील सर्वांत मोठं पॅकेज म्हणतात. हे सर्वांत मोठं पॅकेज नाही. इतिहासातील सर्वांत मोठी थाप आहे. आजपर्यंत कोणी ही थाप मारली नव्हती. इतिहासातील पहिली मोठी थाप फडणवीस सरकारने केली असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला. ज्या पंतप्रधानांना महाराष्ट्रातील शेतक-यांची परिस्थिती माहीत नाही. त्यांच्याकडे काय न्याय मागायचा असा टोला उद्धव ठाकरे यांनी हाणला.

## घरकुलावरून दलित महिलेस जबर मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

कारी ता माजलगाव येथे चक्क एका घरकुलाचे बांधकाम करत असलेल्या महिलेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. उषा वावळकर असे पीडित महिलेचे नाव असून, या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. या प्रकरणी दिंद्रुड पोलीस ठाण्यात ग्रामपंचायत सदस्यासह सहा जणांविरोधात ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव तालुक्यातील कारी येथील रहिवासी असलेल्या उषा वावळकर ▶▶ पान २ वर

## मंत्री बाबासाहेब पाटलांना अजित पवारांनी फटकारले

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. माध्यमांसोबत संवाद साधताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्र्यांनी शेतक-यांबाबत केलेले विधान चुकीचे असल्याचे सांगत याबाबत त्यांच्यासोबत बोलणार असल्याचे सांगितले.एकीकडे बाधित शेतक-यांच्या मदतीसाठी सरकारने पॅकेज जाहीर केले असताना मंत्र्यांकडून वादग्रस्त वक्तव्ये केली जात आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी एका कार्यक्रमात बोलताना लोकांना कर्जमाफीचा नाद लागला आहे असे वादग्रस्त विधान केले. तसेच आम्हाला निवडून यायचं आहे म्हणून तुम्हाला निवडणुकीत काहीतरी ▶▶ पान २ वर

## परळीत गुरूकुलच्या विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण


**परळी । प्रतिनिधी**

शाळेमधून गुरूकुलकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यामध्ये अडवत परिक्षेत पेपर का बघू दिला नाही म्हणून दोघा जणांनी ११ विद्यार्थ्यांना बेल्ट, बुटाने जबर मारहाण करत जखमी केले. ही घटना शहरातील सिध्देश्वर नगर भागातील नर्मदेश्वर गुरूकुलात काल दुपारी घडली. विद्यार्थ्यांना उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले. विद्यार्थ्यांना मारहाण केल्यानंतर पुन्हा गुरूकुल चालकाच्या पित्यालाही मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी दोघा जणांविरोधात परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रळीच्या सिध्देश्वर नगर मध्ये अर्जुन महाराज शिंदे यांचे तीन वर्षापासून श्री नर्मदेश्वर गुरूकुल आहे. ▶▶ पान २ वर

## सिमेंटचे रस्ते फॅक्टरीत बनले पाहिजेत–गडकरी

**नागपूर । प्रतिनिधी**



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सिमेंट रस्त्यांच्या बांधकामात नवीन तंत्रज्ञान वापरण्याबाबत मोठे वक्तव्य केले आहे. सध्याच्या काळात 'रोड फॅक्टरी'ची गरज असून 'प्री-कास्ट' मटेरियलच्या साहाय्याने आता रोड आणि इमारतींचे निर्माण आवश्यक आहे. विशेषत: सिमेंटचे रस्ते तर फॅक्टरीत बनले ▶▶ पान २ वर

## अजितदादांचा इशारा; आ.संग्राम जगतापला नोटीस

**पुणे । प्रतिनिधी**

अहिल्यानगरचे राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांच्या सततच्या वादग्रस्त विधानावरून अजितदादा चांगलेच भडकले आहेत. वारंवार समज देऊनही काही सुधारणा होत नसल्याचे दादांनी स्पष्ट करत दादा त्यांची कानउघाडणी केली आहे हे पक्षाला शोभत नाही जगताप यांच्यामुळे पक्षाच्या सर्वसमावेशक भूमिकेला तडा जात असल्याने यावेळी आ जगताप याना करणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांनी दीपावली सणाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने केवळ हिंदू लोकांच्याच दुकानातून खरेदी करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या भूमिकेमुळे वाद ओढावला होता. त्यावर आज सकाळी माध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.खरंतर अरुणकाका ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | | |
|---|---|---|
| गहू: ७४.५० क्विंटल | | |
| किमान | कमाल | सरासरी |
| २,३५० | २,६९१ | २,५३८ |
| ज्वारी/हायब्रिड: १०४.०० क्विंटल | | |
| २,००० | ३,१५१ | २,३६७ |
| मका/लोकल:२३.०० क्विंटल | | |
| १,६०१ | १,६०१ | १,६०१ |
| तूर : १.५० क्विंटल | | |
| ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : १.०० क्विंटल | | |
| ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ११७.०० क्विंटल | | |
| २,००० | २,८८१ | २,५५५ |
| मुग: ७.०० क्विंटल | | |
| २,५०० | ४,५०० | ३,४८० |
| सोयाबीन: ४८८.०० क्विंटल | | |
| ३,१७० | ४,०२५ | ३,६९५ |
| हरभरा: २.५० क्विंटल | | |
| ५,१३१ | ५,१३१ | ५,१३१ |

# राज्यात भाजपचा राष्ट्रवादीविरोधात सूर






मुंबई : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचाली वेगात सुरू झाल्या असून, सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांचे बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. त्यातच आता महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महायुतीत मतभेद उघड झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकांचा धडाका सुरू केला असून, भाजपच्या बैठकीत थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीला विरोध होताना दिसत आहे भाजपच्या काही नेत्यांनी एकवेळेस शिंदे चालतील, पण राष्ट्रवादीसोबत युती नको, असा सूर लावल्याची माहिती आहे त्यामुळे महायुतीतील ▶▶ पान २ वर

### मविआत संभ्रमाची अवस्था

ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या शक्यता जोर धरत असतानाच राज ठाकरे महाविकास आघाडीत जाणार की, उद्धव ठाकरे बंधूप्रेमासाठी आघाडीतून बाहेर पडणार, यावरही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू होत्या. परंतु, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मनसेला महाविकास आघाडीत घेण्याबाबत नकार असल्याचे म्हटले. यानंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काय होणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात...

### जैन मुनींची राजकीय पक्षाची घोषणा

मुंबई ;राज्यामध्ये काही दिवसांपूर्वी कबुतर खाण्यांचा विषय सध्या जोर धरू लागला आहे. मुंबईमध्ये यावरून मोठ आंदोलनही झालं होतं. जैन धर्मियांनी कबुतरखाना बंद होऊ नये, अशी भूमिका घेतली होती. दरम्यान न्यायालयानं मुंबईतला कबुतरखाना बंद राहणार असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे अनेक कबुतरांचा मृत्यू झाला आहे व त्यांच्या आत्मशांतीसाठी आज मुंबईत जैन समाजाकडून धर्मसभा भरवली गेली होती. त्यांनी आपणही पक्ष स्थापन करणार आणि चिन्ह कबुतर ठेवणार अशी जैनधर्मिय मुनींनी एक पत्रकार परिषद घेत मोठी घोषणा केली आहे.

### जामखेडच्या कलाकेंद्रात राडा;गुन्हे दाखल

अहिल्यानगर : जिल्ह्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील मोहा येथील रेणुका कला केंद्रात मध्यरात्री काही टोळक्यांनी धुमाकूळ घातला. हातात धारदार शस्त्रं आणि काठ्या घेऊन गाड्यांच्या काचा फोडल्या. तसेच कलाकेंद्राच्या आवारातील किराणा दुकानाचे काऊंटर फोडून कलाकेंद्रात प्रवेश केला. हा सगळा प्रकार सीसीटीव्ही कॅमे-यात कैद झाला असून या टोळक्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला रेणुका कलाकेंद्रात शुक्रवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास अज्ञात १७ जणांचा जमाव तोंडाला रुमाल लावून तलवार, काठ्या कोयते घेऊन आले.आवारातील दुचाकी रिक्षांची तोडफोड केली.

### आठवड्यात सुवर्ण बाजारात चांदीला चकाकी

जळगाव : गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीच्या दरामध्ये चढ-उतार होत आहे. सराफा बाजार उघडताच सोन्याचे आणि चांदीचे दर वाढल्याचे चित्र दिसते. मागील पाच वर्षांच्या तुलनेत चांदीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. चांदीचे दर पावणे दोन लाखांच्या आसपास गेला आहे. मागील पाच वर्षांत १०० टक्क्यांपेक्षा जास्त चांदीच्या किमतीत वाढ झाल्याचे चित्र आहे. पुढील काही दिवसांत चांदीला आणखी चकाकी मिळण्याची शक्यता आहे.जळगाव येथील सुवर्ण बाजारात सोने-चांदीच्या भावाचा उच्चांक वाढतच आहे.

### जिथे शक्य तिथे महायुती म्हणून लढणार

नाशिक : पुढील काही महिन्यांमध्ये राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, या पार्श्वभूमीवर आता घडामोडींना वेग आला आहे महायुती आणि महाविकास आघाडीमधील घटक पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. आज नाशिकमध्ये भाजपाची महत्त्वाची बैठक पार पडली, या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठे वक्तव्य केले आहे.जिथे शक्य तीथे महायुती म्हणून निवडणूक लढवणार असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

### मनसेला माविआत सोबत घेण्याचा विचार नाही

मुंबई : महाविकास आघाडीचा प्रमुख पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने मनसेला सोबत घेण्याचे निश्चित केले आहे. त्याला महाविकास आघाडीतील इतर पक्षांचा पाठिंबा असेल का? हा प्रश्न आहे. या संदर्भात आत्तापासूनच मतभेदाचे वारे वाहू लागले आहेत.काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. मनसेला सोबत घेण्याचा कोणताही विचार नसल्याचे त्यांनी सांगितले. सपकाळ यांच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत मिठाचा खडा पडला आहे.दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास राज्याच्या राजकारणात नवा प्रयोग म्हणून त्याकडे पाहिले जाते.

### ट्रम्प करणार कंपन्या अन्? भारतीयांवर कारवाई

वॉशिंग्टन: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षडोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने ऑगस्टमध्ये भारतावर २५ टक्के टॅरिफसहित रशियाचा व्यापार करत असल्याने अतिरिक्त २५ टक्के शुल्क लादण्याचा निर्णय घेतला त्यामुळे अमेरिकेने भारतीय कंपन्या आणि भारतीय व्यक्तींवर कारवाई केली आहे. यात ७ मुंबईतील कंपन्यासंहित इतर दोन भारतीय कंपन्यांचा समावेश आहे. तसेच ८ भारतीय व्यक्तींचा समावेश आहे. अमेरिकेने आरोप केला आहे की, या कंपन्या आणि कारवाई करण्यात आलेले व्यक्ती हे इराणचे तेल, पेट्रोलियम उत्पादने आणि पेट्रोकेमिकल्समध्ये सहभागी आहेत.

cmyk

अग्रलेख

# राजकारणाच्या गुन्हेगारीवर शिक्कामोर्तब !

पुण्यातील गुंड नीलेश घायवळ याचे पलायन व त्याला राजकारण्यांकडून मिळालेली प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत यामुळे राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुण्यात मारणे, आंदेकर यांच्याप्रमाणे घायवळ टोळीही कुप्रसिद्ध आहे. मागच्या काही दिवसांत ही घायवळ गँग राजकारण व गुन्हेगारीच्या पटलावर चांगलीच प्रकाशझोतात आल्याचे दिसून येते. या गँगशी बहुतांश पक्षातील नेते या ना त्या निमित्ताने कनेक्टेड असणे, हे आजचे राजकारण कुठल्या दिशेने चालले आहे, याचेच गमक. नीलेश घायवळचा इतिहास तसा थक्क करणाराच म्हटला पाहिजे. जामखेड तालुक्यातून शिकण्यासाठी पुण्यात आलेला हा गडी गुन्हेगारीकडे वळतो, गज्या मारणेच्या टोळीत सहभागी होतो आणि त्याच्याशी मतभेद झाल्यानंतर आपली स्वतंत्र गँग तयार करतो, हे सगळेच एखाद्या चित्रपटाला साजेशे.

मागच्या काही वर्षांत या दोन टोळ्यांमधील गँगवॉर, रक्तपातही पुणे शहराने अनुभवला आहे. काही दिवसांपूर्वी केवळ गाडीला वाट न दिल्याच्या रागातून या टोळीच्या सदस्यांनी कोथरूडमध्ये गोळीबार केला, दहशत माजवली आणि तिथून पुन्हा घायवळ गँग चर्चेत आली. गुंडांच्या टोळ्यांनाही अनेक चढ उतारातून जावे लागते. अमुक एका टोळीची हवा झाली, की दुसरी टोळी असुरक्षित होते. त्यातून आपले अस्तित्व दाखविण्यासाठी तसेच दहशत निर्माण करण्यासाठी राडे घातले जातात. घायवळ टोळीने तेच केले. मात्र, त्यानंतर पोलिसांनी मुसक्या आवळताच या महशयांनी थेट परदेशात पलायन केल्याचे दिसून आले. आधी लंडनमध्ये घायवळ पळाल्याची वदंता होती. नंतर स्वीत्झर्लंडमध्ये घायवळ गेल्याची माहिती पोलिसांनी दिली. किंबहुना, मकोका अंतर्गत कारवाई झाली असताना त्याला पासपोर्ट कसा मिळाला, असा प्रश्न निर्माण होतो. नावात घोळ घालून, झोलझाल करून घायवळने हा पोसपोर्ट मिळविल्याचेही सांगितले जाते. परंतु, एक गुन्हेगार कागदपत्रांमध्ये खाडाखोड करतो आणि सहजपणे सर्वांच्या हातावर तुरी देऊन परदेशात पळून जाण्यात यशस्वी ठरतो, हे आपल्या सुरक्षा यंत्रणांचे अपयशच म्हटले पाहिजे. इतकेच नव्हे, तर या सर्व नाट्यामय घडामोडींमागे काही काळेबेरे तर नाही ना, अशी शंकाही आल्यावाचून राहत नाही. या सर्व शंकाकुशंका येण्याचे कारण म्हणजे घायवळचे राजकीय कनेक्शन होय. वास्तविक राजकारणी आणि गुंडांचे साटेलोटे आता लपून राहिलेले नाहीत. राजकारणी हवा तेव्हा, हवा तसा गुंडांचा कसा वापर करतात, याच्या सुरस कथा कमी नाहीत. परंतु, एकाच कुख्यात गुंडाचा बहुतेक पक्षात किती घट्ट दोस्ताना असावा, याचे घायवळ हे मूर्तिमंत उदाहरण मानता येईल. विधानसभेचे सभापती राम शिंदे आणि घायवळचे नाव आधीपासूच जोडले गेले आहे. त्यात घायवळचे गाव त्यांच्याच मतदारसंघात. अगदी शिंदे यांच्यात प्रचारातही तो उतरला असल्याचे व्हिडिओ उपलब्ध आहेत. त्यावरून आमदार रोहित पवार यांनी शिंदे यांच्यावर निशाणा साधला असला, तरी घायवळचे पवारांसोबतचे फोटोही व्हायरल झालेले दिसतात. शिंदे गटाचे नेते व माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी तर घायवळच्या मुद्द्यावर भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांतदादा पाटलांनाच घेरण्याचा प्रयत्न केला. चंद्रकांतदादांकडे कामाला असलेल्या समीर पाटील याच्याकडे १०० कोटींची प्रॉपर्टी कशी? समीर पाटील हा मकोकाचा आरोपी असून, घायवळ व समीर एकमेकांच्या संपर्कात आहेत, अशा आरोपांच्या फैरी झाडून त्यांनी दादांच्या दिशेनेच संशयाची सुई सरकवल्याचे पहायला मिळाले. त्याला काही तास उलटत नाहीत, तोच नीलेशचा भाऊ सचिन घायवळ याचा शस्त्र परवाना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या सहीने दिला गेल्याची माहिती पुढे आली. आपापसांतील भांडणातून भाजप व शिंदे गटाच्या नेत्यांनी स्वत:ला कसे उघडे पाडले, याचाच हा नमुना ठरावा. घायवळबाबत प्रश्न विचारल्यावर दादा आय एम सॉरी, असे म्हणत प्र टाळतात. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हेही मौन बाळगत पत्रकार परिषदेतून काढता पाय घेतात आणि या प्रकरणात योगेश कदम यांचे नाव येताच रवींद्र धंगेकर अचानक गप्प होतात. असा हा सगळा चक्रावून टाकणारा मामला. मध्यंतरी मुंबईतील डान्सबार प्रकरणावरून योगेश कदम अडचणीत आले होते. आता या प्रकरणातही एखाद्या गुंडाला शस्त्र परवाना देण्यात त्यांचा हात असेल, तर हे प्रकरण गंभीरच ठरावे. वास्तविक घायवळचा शस्त्र परवाना पोलीस आयुक्तांनी नाकारला होता. मात्र, तरीही त्याला परवाना मिळतो, यातून आपली व्यवस्था आणि आपले नेते काय पात्रतेचे आहेत, हे लक्षात येते. कोकणचे नेते रामदास कदम यांचा आक्रस्ताळेपणा व रडारड करण्यात कुणी हात धरणार नाही. या प्रकरणात पुत्राचे नाव आल्यानंतरही त्यांनी टाहो फोडण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर विधीमंडळातील बड्या नेत्याकडून शिफारस झाल्याची सारवासारवही केली. पण, मग रामदास कदम किंवा त्यांचे सुपुत्र पुढे येऊन संबंधित नेत्याचे नाव का सांगत नाहीत, असा सवाल सर्वसामान्यांच्या मनात येतो. दसरा मेळाव्यात याच रामदासभाईंनी उद्धव ठाकरे यांच्यावर स्वैर आरोप करण्यात धन्यता मानली. आता एका गंभीर प्रकरणात त्यांच्याच मुलाच्या नावाची चर्चा होत आहे. हे पाहता नैतिक जबाबदारी स्वीकारून कदम पुत्र राजीनामा देणार का, याची महाराष्ट्राला उत्सुकता असेल. दुसऱ्या बाजूला घायवळला परदेशी पळून जाण्यात आणखी काही नेत्यांनी मदत केल्याचेही आरोप होत आहेत. संतोष बांगर तसेच तानाजी सावंत यांच्या नातलगांशीही त्यांचे कनेक्शन असल्याच्या चर्चा आहेत. हे बघता घायवळचे जाळे महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वदूर पसरल्याचे तसेच त्यात अनेक नेते अडकल्याचे बघायला मिळते. महाराष्ट्रासारख्या राज्याचे हे अध:पतनच ठरावे.

# रोटरीच्या नेशन बिल्डर अवॉर्ड पुरस्कारांचे वितरण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या नेशन बिल्डर अवॉर्ड या पुरस्काराचे वितरण खोलेश्वर महाविद्यालयाच्या गोपीनाथराव मुंडे सभागृहात झाले. शिक्षकांचा सन्मान, शांतीचे मूल्य आणि विद्यार्थ्यांची प्रेरणा हेच या उपक्रमाचे खरे उद्दिष्ट होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणतज्ज्ञ महेश पाटील,तर व्यासपीठावर सहाय्यक प्रांतपाल प्रवीण देशपांडे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, प्रकल्प संचालक प्रा.संतोष मोहिते,राजेंद्र घोडके, यांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात महेश पाटील यांनी सध्याच्या शिक्षण पद्धतीत शिक्षक ,मुख्याध्यापक



आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वय आणि जे ई ई, नीट या स्पर्धात्मक परीक्षेत तयारीसाठी शालेय स्तरावरील कार्य करण्यास प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक यांनी केले. प्रकल्प प्रमुख संतोष मोहिते यांनी या पुरस्काराची भूमिका विषद केली. प्रकल्प प्रमुख राजेंद्र घोडके यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन गीतांजली कुलकर्णी यांनी तर पाहुण्यांचा परिचय स्वरूपा कुलकर्णी यांनी करून दिला नेशन बिल्डर अवॉर्ड या पुरस्काराने लेफ्ट. डॉ साधना चामले-पन्हाळे(योगेश्वरी महाविद्यालय), सुरेखा काळे(खोलेश्वर शाळा), रागीणी पवार (मुकुंदराज विद्यालय) , स्नेहल लाखे (जिल्हा परिषद,ममदापूर) , सय्यद अफसान बेगम(मिलिया उर्दू स्कूल), तर घाटनांदुर येथील सिनर्जी नॅशनल स्कूल चे मुख्याध्यापक अजहर पठाण ठरले नॅशन पीस बिल्डर चे मानकरी. यांना शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देण्यात आले. शांतता सप्ताह मध्ये घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यातील बक्षीस पात्र विद्यार्थी.चित्रकला - प्रथम श्रेया मानकरी, द्वितीय .ईशान वाडखेलकर आणि सौमित्र रामदासी, तृतीय आस्था ढेले आणि स्वराली घाडगे,उत्तेजनार्थ गायत्री काकडे. निबंध स्पर्धा - प्रथम तन्मय पवार, द्वितीय मानसी जोगी आणि प्रज्वल पाटोळे, तृतीय आनंदी गीते आणि फायजा मुंशी, उत्तेजनार्थ आरोही राजमाने.

# सामाजिक संरचनेचे शिल्पकार भारतरत्न श्रद्धेय नानाजी देशमुख-डॉ.कमलकिशोर लड्डा

**माजलगाव । प्रतिनिधी**

सामाजिक संरचनेचे शिल्पकार भारतरत्न श्रद्धेय नानाजी देशमुख होते असे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले.श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव माजी विद्यार्थी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या जयंती व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी हे होते.पुढे बोलताना ते म्हणाले की नानाजी देशमुख भारतासह जगभरात त्यांच्या आर्थिक सामाजिक, राजकीय कार्यामुळे निष्णात व आदर्शवत कर्मयोगी म्हणून प्रसिद्ध आहेत.ते प्रखर राष्ट्रभक्त,आदर्श राष्ट्रप्रमुख, विनम्रता,सेवावृत्ती व त्यागमूर्ती यांचे उत्कट मिलाप असणारे व्यक्तिमत्व होते.समाज सुधारक म्हणूनही नानाजी देशमुख यांची ओळख आहे. ग्रामविकासाचे प्रणेते म्हणून त्यांनी कृषी,ग्रामोद्योग, सार्वजनिक आरोग्य,ग्रामीण अर्थव्यवस्था इत्यादी कामात रचनात्मक असे योगदान दिले आहे. जल,जंगल जमीन, शिक्षण व लोकजीवन ही नानाजींच्या कार्याची बलस्थाने राहिलेली आहेत. समाजाच्या व ग्रामीण भागाच्या सर्वत्रिक विकासासाठी भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या विचारांची



सद्यस्थितीत गरज असल्याचे प्रतिपादन ही त्यांनी याप्रसंगी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी देखील आयुष्यभर समाजाची सेवा केली व एक आदर्श उभा केला तो आदर्श आजच्या पिढीने अंगीकारणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, सध्या नाना देशमुख यांनी जे आपल्या जीवनामध्ये कार्य केले ते आदर्शवत असे आहे.चित्रकूट या ठिकाणी त्यांनी जो प्रकल्प उभारला आहे तो आजच्या तरुणाई व समाजासमोर एक आदर्श व मूर्तीमंत असे उदाहरण आहे. त्यांच्या विचाराचा वारसा आपण यापुढे चालवला पाहिजे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. त्यांचे विचार आपण आचरणात आणले पाहिजेत व त्या आचरणानुसार आपले जीवन यापन केले तर नक्कीच आपण नानाजी देशमुख यांच्यासारखे महान विभूती बनू शकता असे ते विद्यार्थ्यांना म्हणाले.तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे देखील विचार आपण आचरणात आणले पाहिजेत असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.ज्ञानेश्वर गवते यांनी मानले.या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये,प्रा. अंकुश साबळे पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री,कार्यालय विजय कुलकर्णी व महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### सामाजिक उपक्रमांनी विष्णू घुले

राबविली गेली आणि परिसरात वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला गेला. या उपक्रमात कार्यकर्ते व नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेत मंदिर परिसर स्वच्छ करण्यास हातभार लावला. ''स्वच्छ भारत अभियान'' या संकल्पनेला बळकटी देत स्वच्छतेचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तरनळी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना फराळाची व्यवस्था करण्यात आली, तर उमरी येथील मूकबधिर शाळा, डोनगाव येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खाऊ वाटप करण्यात आले. अनेक कार्यकर्ते व नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. यावेळी पंचक्रोशीतील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभापती विष्णू घुले यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेल्या या सामाजिक सेवा आणि पर्यावरण संवर्धन उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या कार्यामुळे समाजासाठी आदर्श घालून दिला गेला आहे.

---------------

### आज मायक्रो ओबीसी,

भाई, शेख नासिर भाई, महेश वेदपाठक, मधुकर सुरवसे, बबन जंगले, रमाकांत सुवर्णकार, ॲड.सुभाष जाधव, राजेश पुरी, रौफ भाई बागवान, संतोष ताटे, प्रमोद गाडे, सुंदर मारवाळ, ललित पंचभाई, मुनवर भाई बागवान, ज्ञानेश्वर पोतदार आदींसह इतरांनी केले आहे. मायक्रो ओबीसी, बलुतेदार-अलुतेदार समाजाला आवाहन : मायक्रो ओबीसी, बलुतेदार-अलुतेदार बांधवहो, आज आपल्या समाजाला समान न्याय, सन्मान आणि प्रतिनिधित्व मिळवून देण्याची वेळ आली आहे. रोहिणी आयोग लागू करा-मायक्रो ओबीसींना न्याय द्या, या न्यायाच्या हक्कांसाठी प्रत्येक समाजघटकाने आपला आवाज बुलंद करण्याची गरज आहे. ही केवळ बैठक नाही. ही आपल्या अस्तित्वाच्या नव्या दिशेची सुरूवात आहे. तर मग चला, एकजुटीने आवाज उठवूया आणि मायक्रो ओबीसी समाजासाठी न्यायाची नवी पहाट घडवूया. त्यामुळे सर्व समाजबांधवांना या चिंतन परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे मनःपूर्वक आवाहन करण्यात येत आहे.

---------------

### रामलिंग पतसंस्थेकडून

पतसंस्था वडवणी चे सुरुवात आजपर्यंत चे नफा, ठेव , योजना ची माहिती दिली.तसेच बीड जिल्ह्यातील नामांकित असलेली रामलिंग सहकारी पतसंस्था ही आपल्या स्वकर्तृत्वावर उभा आहे.संचालक मंडळांनी गोरं गरिब, छोटे छोटे व्यावसायिकांना कर्ज देऊन त्यांच्या व्यवसायाला हातभार लावावा असे एस .तोटावार साहेब जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी सांगितले..संस्थेच्या वतीने सर्व सभासद बांधवांनी पतसंस्थेत येवून आपली लाभांश रक्कम व किराणा किट हस्तगत करावी असे आवाहन चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले आहे. याप्रसंगी चेअरमन नारायणराव डिगे,माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, सर्जेराव महाराज आळणे, व्यवस्थापक दिगांबरजी गुरसाळी, सर्वश्री संचालक नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, सुरेशराव ढवळशंक, सुभाषराव वाव्हळ,शिवाजीराव टकले, उपमन्यूजी वारे, अर्जुनराव भंडारे,प्रकाश डिगे बाबासाहेबजी मस्के, वैजनाथ डिगे,सभासद विठ्ठलराव भुजबळ, ज्ञानेश्वर रोकडे,गुरुप्रसाद गुरसाळी, मच्छिंद्रनाथ झाडे, दत्तात्रय वीर, बाबुराव खाटोकर, कैलास भुजबळ, रमेश लोकरे,विष्णूपंत पंधारे, गणेश दिंडकर, बंडूभाऊ लबडे,पत्रकार शंकर झाडे, पत्रकार ज्ञानेश्वर वाव्हळ,यांसह कर्मचारी व इतर उपस्थित होते.

---------------

### पिंपळनेर पोलिसांची

तयारीत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये पाच इसमांचा समावेश आहे यात नितीन चिंतामन खांडे (वय ४५, रा. पिंपळगाव मजरा, ता. जि. बीड),राजेंद्र भगवान खांडे (वय ३५, रा. म्हासापुर तांडा, ता. जी.बीड), संभाजी गोपीचंद खांडे (वय ३४, रा. पिंपळगाव मजरा, ता. जि. बीड),अनिल रामा कोरडे (वय ३६, रा. म्हाळसापुर, ता. जि. बीड),शिवाजी गोपीचंद खांडे (वय ३४, रा. पिंपळगाव मजरा, ता. जि. बीड) आरोपींकडून आणि जुगाराच्या ठिकाणावरून एकूण २,७६,५१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.यात त्यांच्या अंगझडतीतील रोख रक्कम व जुगार खेळण्याच्या जागेवरची रोख रक्कम दोन मोटारसायकली: रॉयल इन्फिल्ड (बुलेट) (क्र. २३७९५०) आणि होंडा शाईन चार मोबाईल फोन: ओपो (२), रियल मी (१) आणि सॅमसंग (१) जुगाराचे साहित्य: ५२ पत्त्यांची गड्डी पोलीस शिपाई संतोष वामन तावरे यांच्या फिर्यादीवरून, सर्व आरोपींविरुद्ध कलम १२ (अ) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस स्टेशन करत आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत , अपर पोलीस अधीक्षक पांडकर तसेच उपविभागीय पोलीस अधीकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनात सपोनि मधुसूदन घूगे, पो उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल, पोलीस उप निरीक्षक मेखले व पोलीस अंमलदार अविनाश सानप, संतोष तावरे यांनी केली आहे.

---------------

### आयुर्वेदातील संशोधनासाठी

केले. पुढील सत्रांमध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी वेगवेगळी प्रायोगिक मार्गदर्शक सत्रे घेण्यात आली. भोजनोत्तर सत्रात त्यांनी राज्य व केंद्र शासनाच्या विविध संशोधन योजनांची माहिती दिली. अंतिम सत्रात विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष रिसर्च पेपर लिहून घेत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्य शाळेत आदित्य आयुर्वेद महाविद्यालये सर्व वर्षाचे २०० विद्यार्थी, ४० प्राध्यापक तसेच विशेष म्हणजे आदित्य दंत महाविद्यालयातील पदव्युत्तर () च्या विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला. विद्यार्थी सकाळी १०:३० पासून ५ वाजेपर्यंत कार्यशाळेत दिवसभर तेव्हढ्याच उत्साहात राहिल्यामुळे डॉ.जाई किरण किनी म्हणाल्या की मी संपूर्ण भारत, विदेशात याविषयावर कार्यशाळा, व्याख्याने घेतली आहेत पण मराठवाड्यात सारख्या दुर्गम भागात असे अनुशासीत, सदैव शिकण्याकरता तत्पर विद्यार्थी घडवणारे, विद्यार्थ्याकरिता एव्हढे कष्ट घेणारे संस्थाचालक प्रथमच पाहिले. त्यांनी या करिता डॉ. आदिती सारडा यांचे विशेष आभार व्यक्त करुन कौतुक केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील बालरोग विभागाचे प्राध्यापक डॉ. शाम जोशी यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. स्नेहा साबळे यांनी केले. प्रदीप राठोड, विष्णू झरकर, ऋतुजा देशमुख, द्वितीय वर्षाचे सुशील कांबळे, सानिया बनेवाले, ऋतुजा नवले, प्रथम वर्षाचे गायत्री दुधाळ, क्रांति भुंबे, सायली वाघ, रेहान मुल्लानी, साद चाऊस या ११ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे स्टेजवर समोर येवून कार्यशाळे विषयी आपला अभिप्राय दिला. प्रा. रामेश्वर ढोबळे यांनी आभार मानले.

---------------

### गेवराई येथे शूरवीर जिवाजी

शंकर सूर्यवंशी यांनी जीवा महाले यांच्या विषयी माहिती सांगितली तर ह भ प तुळशीराम महाराज आतकरे यांनी त्यांच्याविषयी पोवाडा सादर केला या अभिवादन कार्यक्रमास प्रकाश आधार चे संपादक सुनील पोपळे,नाभिक एकता कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष,ज्ञानेश्वर चातुर, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे मराठवाडा उपाध्यक्ष नानासाहेब पंडित बाबुराव पवळे रामेश्वर राऊत माऊली पंडित ओम छडीदार बाळासाहेब आतकरे गणेश पंडित ह भ प राजेंद्र महाराज पंडित आकाश वैध गणेश गोरे आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर चातुर यांनी मांडले

---------------

## पान १ वरून...

### कापूस खरेदीला १५

आहेत. नोंदणीसाठीची मुदत आता ३० सप्टेंबरपासून वाढवून ३१ ऑक्टोबरपर्यंत करण्यात आली आहे.नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीची पडताळणी राज्य सरकारकडून केली जाते. ही पडताळणी पूर्ण झाल्याशिवाय खरेदी प्रक्रिया सुरू होऊ शकत नाही, असे सीसीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. यासाठी महाराष्ट्र सरकारने कृषी उत्पन्न बाजार समित ला शेतकऱ्यांच्या माहितीची पडताळणी करण्याचे अधिकार दिले आहेत. यामुळे सरकारी यंत्रणांवरील ताण कमी होण्यास मदत होत आहे.

---------------

### संभाजीनगरमध्ये हंबरडा मोर्चातून

मागणी केली. १५ दिवसांपूर्वी मी मराठवाड्यात आलो होतो. पाच एक जिल्ह्यांत शेतक-यांना भेटलो होतो. तेव्हाच जाहीर केलं होतं की जोपर्यंत हे सरकार कर्जमुक्ती करत नाही, तोपर्यंत सरकारला सोडत नाही. गेल्यावेळी पाऊस होता. आता कडक ऊन आहे. आम्ही शहरी बाबू. लोकं विचारतात हे काय जाणार तिकडे. दोन गोष्टी केल्या. परंपरेप्रमाणे दसरा मेळावा घेतला. पाऊस पडत असताना चिखलात घेतला. आज तर कडक ऊन आहे. मेळाव्याच्या वेळी विचारले लोक चिखलात कसे बसणार. शेतकरी ऊन वारा पावसात अन्नधान्य पिकवतो. त्याचे आयुष्य चिखलात असते. आपण साधी सभा घेऊ शकत नाही, असे ते म्हणाले.बोलणा-यांना बोलू द्या. तुमच्या प्रत्येक संकटावेळी शिवसेना तुमच्यासोबत राहील. संकटाशी लढल्याशिवाय राहणार नाही. ५० हजार पर हेक्टर मागितले. हे काही मला स्वप्न पडलं नाही. शेतक-यांना विचारून सांगितलं. मी म्हटलं तुमची किती अपेक्षा आहे. म्हणजे गाडा चालला पाहिजे. शेतकरी म्हणाले, ५० हजार पाहिजे. कर्जमुक्ती पाहिजे, अशी उद्धव ठाकरे यांनी मागणी केली.

---------------

### राज्यातील शाळांची सुरक्षा

जिल्हानिहाय शाळा व त्यांच्यासमोर अहवाल अशी माहिती पालकांना पाहता येते. उर्वरित सर्व शाळांना १५ ऑक्टोबरपर्यंतची अंतिम मुदत शिक्षण विभागाने घालून दिली आहे. त्यानुसार सरकार त्याविषयी लक्ष ठेवेल. तसेच शिक्षण विभागाच्याच जीआरचे अनुकरण करून महिला व बालकल्याण विभाग व आदिवासी विकास विभागानेही आपल्या अखत्यारीतील शाळांमधील अंमलबजावणीवर देखरेख सुरू केली आहे', अशी माहिती सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी सुनावणीत दिली. पालघरमधील आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या नुकत्याच घडलेल्या घटनेबाबत खंडपीठाने यावेळी चिंता व्यक्त केली. बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणानंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दोन निवृत्त न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ समितीने अभ्यासपूर्वक अहवालाद्वारे शिफारशी केल्या होत्या. त्यानंतर राज्य सरकारने १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे (जीआर) राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्वसमावेशक उपाययोजना निश्चित करून दिल्या आहेत.

---------

### परळीत गुरूकुलच्या

या गुरूकुलात ४२ विद्यार्थी भजन, किर्तन, मृदंगाचे शिक्षण घेवून कृष्णा नगर व गणेश पार रोडवरील शाळेमध्येही ते शिक्षण घेत आहेत. शुक्रवारी या विद्यार्थ्यांची शाळेत परिक्षा होती. परिक्षा देवून विद्यार्थी गुरूकुलाकडे जात असतांना त्यांना दिनेश माने व बाळू एकीळवाले या दोघाजणांनी अडवून तुम्ही परिक्षेत पेपर का पाहू दिला नाही असे कारण पुढे करत विद्यार्थ्यांना मारहाण केली. या मध्ये रोहन, कृष्णा, प्रणव, वैभव, वरद सह ११विद्यार्थी जखमी झाले. घडलेला प्रकार विद्यार्थ्यांनी अर्जुन महाराज शिंदे यांच्या भावजईंना सांगितला. त्यांनी मग शिंदे यांना दुरध्वनीकरून घटनेची माहिती दिली. शिंदे गुरूकुलात आल्यानंतर त्यांनी जखमी विद्यार्थ्यांना उपजिल्हा रूग्णालयामध्ये दाखल केले. मुलांना रूग्णालयात घेवून गेल्यानंतर महाराजांचे वडील बाबासाहे शिंदे यांना देखिल मारहाण करून जखमी करण्यात आले. या प्रकरणी अर्जुन शिंदे यांच्या फिर्यादीवरून दिनेश माने व बाळू एकीळवाले या दोघांविरोधात परळी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

--------------

### मंत्री बाबासाहेब पाटलांना

आश्वासनं देतो अशीही कबुली मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. दरम्यान, आता यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली.मी त्यांना शेतक-यांबाबतीत केलेल्या विधानाबाबत बोलणार आहे. मी त्यांना काय सांगायचं ते सांगणार आहे. शेतकरी हा बळीराजा आहे. लाखाचा पोशिंदा आहे. ३२ हजार कोटींचे पॅकेज देताना मुख्यमंत्र्यांनीही सांगितले आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. एकीकडे बाधित शेतक-यांच्या मदतीसाठी सरकारने पॅकेज जाहीर केले असताना मंत्र्यांकडून वादग्रस्त वक्तव्ये केली जात आहेत.

-----------

### घरकुलावरून दलित

यांच्या आईच्या नावे शासकीय घरकुल योजना मंजूर झाली होती. मंजूर झालेल्या जागेवर जुने घर पाडून नवीन घराचे बांधकाम सुरू असताना, गावातील काही व्यक्तींनी त्यास विरोध केला. ''आमच्या शेजारी घर बांधायचे नाही,'' असे म्हणत आरोपींनी उषा वावळकर यांच्यावर हल्ला चढवला. या हल्ल्यात वावळकर यांना जबर मारहाण करण्यात आली, ज्यामुळे त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. प्रसंगावधान राखून आणि स्थानिकांच्या मदतीने त्यांनी स्वतःचा जीव वाचवला. यानंतर त्यांनी थेट दिंद्रुड पोलीस स्टेशन गाठून घडलेला प्रकार सांगितला व आरोपींविरोधात तक्रार दाखल केली.

----------------

### अजितदादांचा इशारा; आ.संग्राम

जगताप जोपर्यंत हयात होते तोपर्यंत सगळे तिथे सुरळीत होते. परंतु आता काही लोकांना आपल्यावर जबाबदारी वाढलेली आहे. आपल्या वडिलांचे छत्र हरवले आहे. त्यावेळेस आपण जबाबदारीने वागलं पाहिजे, बोललं पाहिजे. हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. हा सर्वांना बरोबर घेऊन जाणार आहे. मी एका कार्यक्रमाला गेलो होतो तेव्हाही त्याला समजावून सांगितले होते. तो म्हणाला होता की, मी त्यात सुधारणा करेल. पण तो सुधारणा करताना दिसत नाही.त्यामुळे त्याची जी भूमिका आहे, त्याचे जे विचार आहेत ते पक्षाला अजिबात मान्य नाहीत. त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल. अशी स्पष्ट भूमिका अजितदादांनी जाहीर केली. त्यामुळे संग्राम जगताप यांना पक्षाकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात येणार आणि त्यांना त्यावर त्यांची बाजू मांडावी लागेल असे समोर येत आहे.अहिल्यानगर शहर गेल्या काही दिवसांपासून धार्मिक ध्रुवीकरणाचे केंद्र ठरत आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वीपासून औरंगजेब फॅन क्लबने तिथे खळबळ उडवून दिली होती. त्यानंतर हिंदू-मुस्लिम तणाव दिसून आला होता. करमाळा येथील हिंदू जन आक्रोश मोर्चात संग्राम जगताप यांनी दिवाळीची खरेदी हिंदूंकडून करण्याचे आवाहन केले होते. दीपावली सणानिमित्त प्रत्येक नागरिकाने खरेदी केवळ हिंदूच्याच दुकानातून करावी असे त्यांचे वक्तव्य होते.

---------------

### सिमेंटचे रस्ते फॅक्टरीत

पाहिजेत. प्री-कास्टच्या माध्यमातून स्लॅब तयार झाले पाहिजेत व क्रेनने आणून ते बसवले पाहिजेत, असे प्रतिपादन गडकरी यांनी केले.

इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनीअर्स नागपूर शाखेच्या वतीने 'फॉरेन्सिक सिव्हिल इंजिनीअरिंग' या विषयावरील दोन दिवसीय अखिल भारतीय चर्चासत्राचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनीअर्स एमएसईचे अध्यक्ष ए. डब्ल्यू जवंजाळ तसेच इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनीअरचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष कोठारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

--------------

### राज्यात भाजपचा राष्ट्रवादीविरोधात सूर

धुसफूस समोर येत आहे. एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी वेगात सुरू असतानाच लोकसभा आणि विधानसभेला महायुती म्हणून एकजुटीने लढणा-या तीन पक्षांमधील धुसफूस आता हळूहळू समोर येऊ लागली आहे. राज्यात सत्तेसाठी भाजपसोबत राष्ट्रवादी आणि शिवसेना एकत्रित आले असले तरी अजित पवारांच्या राष्ट्रवादीला भाजपअंतर्गत प्रचंड विरोध आहे. परंतु आतापर्यंत तो समोर येत नव्हता. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता हा विरोध समोर येऊ लागला आहे. भाजपच्या गोटातून तर थेट अजित पवार नकोत, अशीच भूमिका घेतल्याचे समोर येत आहे. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सावध भूमिका घेतली आहे. तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते एकत्र बसून यावर अंतिम निर्णय घेतील, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आगामी काळात पुणे, मुंबई आणि इतर महत्त्वाच्या महापालिकांच्या निवडणुकांसाठी जागावाटपावरून महायुतीतील भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात संघर्ष होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अगदी सुरवातीपासूनच शिंदे चालतील पान अजित पवार नाही अशी भूमिका काही पदाधिकाऱ्यांनी घेतली होती पान महायुतीचा धर्म आणि पक्षाचा आदेश म्हणून काम चालत आहे पन हे काम मनातून करत नसल्याचे दिसत आहे त्यामुळे आगामी महापालिका नगरपालिका निवडणुकीत काय घडणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५



## थोडक्यात...

### रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई पदग्रहण समारंभाचे १४ ऑक्टोबर रोजी आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई यांच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या चार्टर प्रदान व पदग्रहण समारंभाचे मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता खंदारे मंगल कार्यालय, तथागत चौक, अंबाजोगाई येथे आयोजन करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे तसेच संचालक मंडळाच्या चार्टर प्रदान व पदग्रहण समारंभास प्रमुख अतिथी म्हणून रो.सुधीर लातुरे (प्रांतपाल ३१३२), रो.डॉ.गिरीश कुलकर्णी (उपप्रांतपाल) आणि रो.सुनील जोशी (क्लब एक्स्टेंशन डायरेक्टर) या मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे. तसेच यावर्षी गणेश उत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या आरास देखावा व विसर्जन मिरवणुक स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण ही याच कार्यक्रमामध्ये करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सिध्देश्वराच्या पखवाज सेवकाची सेवा सोरटी सोमनाथाच्या चरणी !



शिरूर कासार: येथिल रहिवासी तथा सुप्रसिद्ध पखावज वादक तालमणी गिरणार रत्न हरिप्रसाद गाडेकर पाटील त्यांचे गुरू पं. उध्दवबापु आपेगांवकर सह गुरुबंधु विवेकानंद कुरंगळे, पनवेल व गुरुबंधू सनतकुमार बडे, परळी यांच्या समवेत बारा ज्योतिर्लिंगांतील सोरटी सोमनाथाच्या चरणी पखावज तालस्पर्श सेवा रूजू करण्यासाठी रविवारी गुजराथकडे मार्गस्थ झाले.सोमनाथ संगीत महोत्सव या कार्यक्रमात आपला संपुर्ण भारतात तसेच युरोपमध्ये ( बेल्जियम, फ्रान्स) या देशात गाजलेला तालस्पर्श या पखावज वादनाची सेवा दि. १२ ऑकटोबर रोजी गुजरात राज्य संगीत नाटक अकादमी, सोमनाथ मंदिर ट्रस्ट,व पटेल कल्चरल फाउंडेशन यांच्यामार्फत आयोजीत केलेली असुन त्यखसाठी या पखावज कलाकारांना निमंत्रीत करण्यात आले आहे.

### राज्यस्तरीय अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित रहा -प्रा. गोविंद जाधव

घाटनांदुर । प्रतिनिधी

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रत्येक विद्यार्थी ज्ञानाने, गुणवंतेने खंबीरपणे उभा राहण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या खाजगी शिकवणी साठी गत सहा वर्षापासून अविरत कार्यकरणाऱ्या कोचिंग क्लासेस असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे सहावे राज्यस्तरीय अधिवेशन सोलापूर येथे मोठ्या उत्साहात साजरे होणार आहे त्यासाठी सर्व कोचिंग क्लासेस संचालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष प्रा वाघ,संयोजक प्रा काशिनाथ भतगुणकी, बीड जिल्हाध्यक्ष प्रा गोविंद जाधव यांनी केले आहे. कोचिंग क्लासेस असोसिएशनचे रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत व्ही. व्ही.पी. कॉलेज, सोरेगाव, सोलापूर येथे राज्यस्तरीय सहावे अधिवेशन होणार आहे.



या कार्यक्रमात पूग्रस्तांना मदत, मान्यवरांचा सत्कार व पुरस्कार वितरण सोहळादेखील होणार आहे,या अधिवेशनमध्ये खाजगी कोचिंग क्लास संचालकांच्या विविध समस्या व आव्हाने यावर चर्चा, परिसंवाद, खुली चर्चा होणार असून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व जीवनगौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे. अश्या भव्य दिव्य स्वरूपात होणाऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राज्य कमिटी तर्फे करण्यात आले आहे.

## मिलिंद एकबोटे बीडमध्ये आलाच नाही पाहिजे!

बीड : साळेगाव बाजारपेठेतील घटनेनंतर जिल्ह्यातील शांततेचे वातावरण जाणूनबुजून बिघडविण्याचा प्रयत्न सुरू झाला असून, त्यामागे काही तथाकथित हिंदुत्ववादी नेत्यांचा हात असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे. ''गौरक्षक'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केशव रत्नपारखे यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेला काही लोकांनी जाणूनबुजून राजकीय आणि धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था धोक्यात आणली जात असल्याचे सरवदे यांनी सांगितले. सरवदे म्हणाले, ''मिलिंद एकबोटे, आमदार संग्रामभैया जगताप, ह.भ.प. संग्राम भंडारे आणि आमदार गोपीचंद पडळकर यांनी जाहीर केलेला तथाकथित 'हिंदू जनआक्रोश मोर्चा' हा जिल्ह्यात तणाव निर्माण करण्याचा धोकादायक प्रयत्न आहे. सणासुदीच्या काळात असा मोर्चा काढून समाजात तेढ निर्माण करण्याचा कट रचला जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून या मोर्चाला व सभेला परवानगी नाकारावी. सध्या जिल्ह्यातील वातावरण शांततेकडे जात असताना बाहेरील नेत्यांकडून 'लव्ह जिहाद', 'लँड जिहाद', 'धर्मांतर', 'गोहत्या' अशा भडक भाषेत सोशल मीडियावर प्रचार सुरू आहे. या प्रकारांमुळे जिल्ह्यात सामाजिक तणाव वाढत असून, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होऊ शकतो.

# प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार -आ.संदीप क्षीरसागर

## बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष आणि सर्व जागेवर नगरसेवक निवडून आणणार - आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत आपलाच उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून येणार असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला. आगामी बीड नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.११ (शनिवार) रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मोठी गर्दी पाहावयास मिळाली. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार उपस्थित होते. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले.**

यावेळी बोलताना म्हणाले की,अतिवृष्टीच्या पावसामुळे अनेक ग्रामीण भागात नुकसान झाल्यामुळे नगर पालिकेची निवडणूक अगोदर होणार आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधक जातीचे राजकारण करतील. त्यांना न जुमानता जोमाने कामाला लागा. लोकांना काम करून दाखवायचे आहे. लोकांचे काम केले तर लोक डोक्यावर घेतील. लोकांशी संवाद साधून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तत्पर रहा. प्रत्येक वॉर्डात कार्यकर्त्यांनी समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. येणाऱ्या नगर पालिकेच्या निवडणुकीत पक्ष प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. तसेच बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष पदाचा आपलाच उमेदवार हा १० हजार मताने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व जागेवर नगरसेवक निवडून येतील. आमदारकीच्या निवडणुकीत सोबत राहिलेल्या आणि माझ्यासाठी एकनिष्ठ प्रामाणिक राहून काम करणाऱ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांसाठी घरातला सदस्य समजून काम करून निवडून आणणार ते असल्याचे सांगून कार्यकर्त्यांना बळ दिले यावेळी आ.संदीप क्षीरसागरांना देखील कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्या जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटता कामा नये -आ.संदीप क्षीरसागर

शहरातील कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटली नाही पाहिजे. साखळी जर तुटली नाही तर नगर पालिका आपल्याच ताब्यात येणार. जर का कोणी उमेदवार साखळी तोडून गेला तर लोकांना तो माझा उमेदवार नाही असे सांगेल. साखळी तोडणाऱ्याला निवडणुकीत धडा शिकवण्यासाठी जनताच पुढाकार घेईल असा इशारा देखील आ.संदीप क्षीरसागरांनी बैठकीत दिला.

## न्या.भूषण गवई यांच्यावरच्या हल्ल्याच्या प्रयत्नाचा विवेक विचार मंच व संविधानप्रेमी तरुण नागरिकांचा तीव्र निषेध

आष्टी । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. श्री भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाचा विवेक विचार मंच महाराष्ट्र तर्फे आज आष्टी तहसील कार्यालयात मा. तहसीलदार यांच्या मार्फत मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

या निवेदनात विवेक विचार मंचाने नमूद केले आहे की, न्यायालयाचे सर्वोच्च सरन्यायाधीशांवर हल्ला करण्याचा प्रयत्न हा केवळ एका व्यक्तीवरचा नव्हे तर संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या भारतीय प्रतिष्ठेवरचा गंभीर आघात आहे. मतभेद व्यक्त करण्याचे संविधानिक मार्ग असताना हिंसेचा अवलंब करणे हे असभ्य, असंविधानिक आणि लोकशाहीविरोधी आहे. निषेधिाण संयोजक अँड. प्रबोधन निकाळजे यांनी ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. अशा प्रकारच्या घृणास्पद घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून प्रशासनाने सुमोटो गुन्हा दाखल करून आरोपीवर कठोर कारवाई करावी आणि न्यायमूर्तींच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. विवेक विचार मंचाने समाजातील सर्व घटकांना शांतता, विवेक आणि संविधाननिष्ठ आचरणाचे पालन करण्याचे आवाहन केले असून, या घटनेला राजकीय व धार्मिक रंग देणाऱ्या समाजद्रोही प्रवृत्तींचा देखील तीव्र निषेध केला आहे. या वेळी देविदास काळपुंड, निखिल शिंदे, नितीन निकाळजे, अविनाश निकाळजे, अक्षय निकाळजे, गणेश गायकवाड, किरण साबळे, अप्पा साबळे, इंजि. अक्षय सिरसवाल अजय निकाळजे, अनिकेत थोरात, श्याम साळवे, किरण जगताप, अमोल धोत्रे, सागर सावंत, सतीष राज-गुरू, यशवंत सदाफुले, शुभम शिंदे, राजू गायकवाड, यशोदीप गायकवाड, विकास मोरे, अंशुल निकाळजे, इंजि. अक्षय सिरसवाल, हर्षवर्धन निकाळजे, आदित्य गायकवाड व मयूर बांढरे आदी संविधानप्रेमी सुजाण नागरिक तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

## उद्या प्राचार्य भ.कि.सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात १३ आक्टोंबर सोमवार रोजी स्व.प्राचार्य भ.कि.सबनीस यांच्या स्मृती प्रित्यर्थ सकाळी वक्तृत्व स्पर्धा संपन्न होत असून स्पर्धेचे उद्घाटन व्यवस्थापकीय संचालक डॉ.विवेक भोसले यांच्या हस्ते व योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असून यावेळी निवृत्त उपप्राचार्य पी.एस.कुलकर्णीआदी तर समारोप सत्रात यो.शि.संस्थेचे कार्यकारी उपाध्यक्ष गणपत व्यास, संस्थेचे सल्लागार एन.के. गोळेगांवकर,एम.एस. लोमटे हे उपस्थित राहणार आहेत.प्राचार्य भ.कि.सबनीस हे महाराष्ट्रातील नामांकित प्राचार्य,प्रसिद्ध विचारवंत होते त्यांनी दिर्घकाळ मराठवाडा प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष पद भुषविले.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्य केले.



स्पर्धेसाठी

१) एक देश एक निवडणुक २) कृत्रिम बुद्धीमत्ता संधी व आव्हाने

३) देशाच्या सक्षमीकरणात महिलांचे योगदान ४) जागतिक राजकारणातील सत्ता संघर्ष आणि लोकशाहीचे भवितव्य ५) शाश्वत विकासात युवकांची भूमिका

हे विषय असून स्पर्धा वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी असून प्रत्येक महाविद्यालयास दोन विद्यार्थ्यांचा संघ या स्पर्धेसाठी पाठविता येईल.स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम दहा हजार व प्रमाणपत्र, द्वितीय सात हजार व प्रमाणपत्र,तृतीय पाच हजार व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ तीन हजार रुपये प्रमाणपत्र यासह वैयक्तिक पातळीवरही पारितोषिके दिली जाणार असून सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहेत महाराष्ट्रातील वरीष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अधिकाधिक संख्येने या स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.पी.एस.देशमुख, उपप्राचार्य डॉ.जितेंद्र देशपांडे,डॉ.रमेश सोनवळकर, यो.शि.सं.कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब मसने यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

## कोजागिरी निमित्त गेवराईत रोटरी क्लबचे कवि संमेलन उत्साहात

**गेवराई । प्रतिनिधी**

**एरव्ही कवि संमेलन म्हटलं की प्रेमाचा प्रेमभंगाचा बहार फुलवला जातो परंतु माणुसकी, संवेदनशीलता , सामाजिक भान राखत देशभक्ती, वात्सल्य , भारूड, प्रबोधन , पूरग्रस्तांच्या वेदना कवींच्या मुखातून व्यक्त होण्याचा योग रोटरी क्लब ऑफ गेवराई व साहित्यिक यांच्या वतीने आयोजित कोजागिरी पौर्णिमेच्या कवि संमेलनाने धमाल उडवून दिली.**




पत्रकार भवनात रोटरी क्लब ऑफ गेवराई व शहरातील कवि - साहित्यीक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवि संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ साहित्यीक ड . सुभाष निकम हे होते . मंचावर रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन , सामाजिक कार्यकर्ते एस . वाय .अन्सारी , रामानंद तपासे, प्रा . गणेश सूर्यवंशी , अक्षय कुलकर्णी , शिक्षक पतसंस्थेच्या संचालिका दक्षा वानखेडे , रोटरीचे क्लब डमिनिस्ट्रेशन चेअरमन गणेश कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती . कवि संमेलन असल्याने कवी - साहित्यीक, कविता प्रेमींनी गर्दी करायला सुरुवात केली होती. दीप प्रज्वलन करून रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांच्या प्रतिमेला पुष्पमाला घालण्यात आली . कवि संमेलनाची सुरुवात गायक शेख खाजा यांच्या पहाडी आवाजात गुरु स्तवन व 'जहाँ डाल डालपर सोने की चिडिया करती बसेरा, वो भारत देश है मेरा ' या देशभक्तीपर गीताने झाली . कवयित्री सुरेखा रामदासी यांनी स्वागत गीत सादर केले . कवी मुकुंद टाक यांनी आई व सनई चौघडा काव्य रचना सादर केली . गणेश कुलकर्णी यांनी सीमेवर लढणाऱ्या जवानाशी आईचा त्यागमय संवाद कवितेतून सादर केला . डॉ . पल्लवी पंडित शीघ्र कवी , शायर एस . वाय . अन्सारी यांनी आपली कविता व ज्वलंत प्रश्नावर शेर सादर करून टाळ्या मिळवल्या . याप्रसंगी दक्षा वानखेडे, सुनिता नागरे, वंदना हिरे, सुरेखा रामदासी, अमृता परड ,साक्षी शिंगाडे , अंशना मचे , भिवाजी अडागळे, प्रा . सुरेश पाटील, रामानंद तपासे , ड . प्रशांत वाघमारे , प्रियंका कोकाट आदींनी आपापल्या कविता सादर करून रसिक प्रेक्षकांना काव्यमय सागरात डुंबून काढले .

## 'समजावणे जणांचे कळते मला न काही' मसापमध्ये रंगले गझल संमेलन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने दि ०६ ऑक्टोबर सोमवार रोजी आयोजित करण्यात आलेले गझल संमेलन चांगलेच रंगले.या गझल संमेलनाच्या अध्यक्षस्थानी गझलकार डॉ.सारंग कुलकर्णी होते.यामध्ये लता जोशी,खेलबा काळे,बालाप्रसाद चव्हाण,मोहन राठोड या गझलकारांचा समावेश होता.

गझलकार डॉ. सारंग कुलकर्णी यांनी समजावणे जनांचे कळते मला न काहीसरणात जाणत्यांचे कळते मला न काही ही गझल सादर केली. गझलकारा लता जोशी यांनी आई झाल्यावरती मजला कळली माझी आई कळल्यावरती आईला गहिवरली माझी आई ही आईची महती वर्णन करणारी गझल सादर केली. गझलकार मोहन राठोड यांनी आता मला जराशी आलीय की थकावट,बदनाम रे कराया धजलेत आप्त सारे ही गझल सादर केली. गझलकार बालाप्रसाद चव्हाण यांनी या घडीला त्या घडीचा मोह नाही,कमलनयनी प्रेम ते विद्रोह नाही ही गझल सादर केली.गझलकार खेलबा काळे यांनी गांजलेली, पिचलेली माणसे गेली कुठे,चळवळीतून पाहिलेली माणसे गेली कुठे ही गझल सादर केली.याशिवाय या गझलकारांनी आणखी काही गझल सादर केल्या. गझल संमेलनाच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. सारंग कुलकर्णी यांनी गझल या प्रकारबद्दल सविस्तर माहिती सांगितली. या गझल संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन मोहन राठोड यांनी केले तर आभार बालासाहेब झोडगे यांनी मानले. यावेळी मसापचे पुर्वाध्यक्ष मुकुंदराज सोळंके,मसापचे अध्यक्ष प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड, कार्यवाह किशोर गुंजकर, बालासाहेब झोडगे, प्रा.हिरामण डावरे, गौरी देशमुख,मयूरा दैठणकर,सुनीता बडे,मुक्ता चव्हाण, अनुजा जोशी, प्रकाश पत्की,वि. रा.कांबळे,शंकर राठोड,यशवंत माणिक,सुमंत देशमुख,बाळासाहेब पांचाळ,अमोल जोशी,दिलीप काकडे,ज्ञानेश्वरी रेड्डी,भगवान धरपडे,भारत कोरडे यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छाया पांचाळ मृत्यू प्रकरणी विभागीय आरोग्य कार्यालयात किस्किंदा पांचाळ

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा रुग्णालयात प्रसुतीदरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या छाया गणेश पांचाळ (वय २५, रा. आंबिलवडगाव, ता. जि. बीड) यांच्या मृत्यू प्रकरणात मुख्य दोषींवर कारवाई न करता केवळ मावशीवर अन्यायकारक निलंबन करण्यात आल्याचा आरोप किस्किंदा पांचाळ यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी मा. श्रीधर पाठक, मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक विभागीय आरोग्य कार्यालय लातूर यांना आज लेखी निवेदन सादर केले.**

उपसंचालक परिमंडळ कार्यालय लातूर येथील मा. श्रीधर पाठक यांनी या प्रकरणी चौकशी समितीकडून अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसल्याचे स्पष्ट केले असून, आतापर्यंत अहवाल यायला हवा होता; मात्र समितीने तो सादर केलेला नाही, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, किस्किंदा पांचाळ यांनी आठ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास लातूर येथील उपसंचालक कार्यालयासमोर 'बोंबामारो आंदोलन' आणि उपसंचालकांना काळे फासण्याचा इशारा दिला आहे.या समितीला चार दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, अजूनपर्यंत अहवाल सादर झालेला नसल्याची माहिती उपसंचालक पाठक यांनी दिली आहे. कुटुंबीय आता थेट लातूर येथील विभागीय आरोग्य प्रशासन दरबारी न्यायासाठी लढत असून, योग्य ती कारवाई न झाल्यास सामाजिक रोष भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. यांची सर्वस्व जबाबदारी शासन प्रशासनाचे राहील.या वेळी उपस्थित सुदर्शन बोराडे मानव विकास संरक्षण समिती जिल्हाध्यक्ष लातूर, मोहन पोद्दार जिल्हाध्यक्ष लातूर ओबीसी हक्क परिषद, सुदाम पांचाळ विश्वकर्मा विकास महामंडळ लातूर, मयत छाया पांचाळ यांचें पती गणेश पांचाळ, सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदा पांचाळ उपस्थित होते.



## आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने १०० रुग्णांना ८२ लाखांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत

**आष्टी । प्रतिनिधी**

**दु:खात असलेल्या माणसाला आधार देणं, हेच खरं देवपूजेचं काम आहे, या भावनेला साकार करत मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आणि प्रेरणेने 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' या ग्रुपने गेल्या एका वर्षात समाजात एक आदर्श निर्माण केला असून या कालावधीत या ग्रुपच्या माध्यमातून १०० रुग्णांना तब्बल ८२ लाखांची आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व विविध शासकीय योजनांमधून मिळवून देण्यात आली.**



ही मदत फक्त आर्थिक नव्हे, तर प्रत्येक रुग्णाच्या जीवनात पुन्हा आशेचा किरण निर्माण करणारा आ.सुरेश धस यांचा संवेदनशील प्रयत्न ठरला आहे. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' ग्रुपचे कार्यकर्ते रुग्णसेवक अमर वाळके हे रुग्णांच्या उपचारासाठी लागणारी कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, शासकीय योजना, तसेच वैद्यकीय सल्ला या सर्व टप्प्यांवर रुग्णांच्या सोबत राहून मार्गदर्शन करतात. त्यामुळे शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत पोहोचवण्यात या उपक्रमाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या कार्याची प्रेरणा फक्त आणि फक्त आमदार सुरेश धस यांच्या जनतेसाठी सदैव तत्पर या कार्यपद्धतीतून मिळाली असल्याचं ग्रुपचे कार्यकर्ते सांगतात. रुग्ण सेवक अमर वाळके म्हणाले,गेल्या वर्षभरात आमच्या ग्रुपने १०० रुग्णांना मदतीचा हात दिला आणि शासन योजनांमधून ८२ लाखांची थेट आर्थिक मदत मिळवून दिली. या सेवाभावी प्रवासात मला थोडं का होईना आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली योगदान देता आलं, ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या उपक्रमामुळे आष्टी मतदारसंघात सामाजिक बांधिलकीची परंपरा अविरत चालू आहे.गरजू रुग्णांना नवसंजीवनी देण्याचं काम 'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' ग्रुप सातत्याने करत आहे.

## अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील कार्यरत असणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा २०% वाढीव टप्पा शासनाने मंजूर केला आहे. शिवाय ०१ ऑगस्ट २०२५ पासून या शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्यानुसार वेतन देण्याचे शासनाने जाहीर केले. परंतु अद्यापही २० टक्के वाढीव टप्प्यानुसार या शिक्षकांच्या खात्यात वेतनाची रक्कम जमा झाली नाही. किमान दिवाळी सणाच्या निमित्ताने या सर्व शिक्षकांचे वेतन २० टक्के वाढीव टप्प्यानुसार व्हावे, त्यासाठी लागणाऱ्या निधीची शासनाकडे मागणी करावी या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना निवेदनाद्वारे केली आहे.



जिल्हयातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करा या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील मॅडम आणि वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना दिले. त्यानंतर शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम पदाधिकाऱ्यांशी बोलताना म्हणाल्या की, राज्यातील सर्व विनाअनुदानित शिक्षकांची दिवाळी गोड करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्या दृष्टीने काम सुरू आहे. जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी आम्ही वरिष्ठ कार्यालयाच्या सातत्याने संपर्कात आहोत. त्यांचे योग्य मार्गदर्शन मिळाताच क्षणांचा ही विलंब न करता आपले वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन देऊन सर्व अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात त्यांचे हक्काचे वेतन जमा करू असे आश्वासन दिले. दुसरीकडे वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना ही निवेदन दिले. या वेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांना आपली मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे कळवली जाईल व वाढीव टप्प्यासाठी लागणारा आवश्यक निधीची मागणी करून अंशतः अनुदानित शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. दोन्ही अधिकाऱ्यांनी दिवाळीच्या पूर्वी वाढीव टप्प्याप्रमाणे वेतन खात्यात जमा होणार या

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.१२ ऑक्टोबर २०२५
४

# महापुरात ऊसाबरोबर जमिनही गेली वाहून, प्रशासनाच्या चुकीचा फटका

## शेतकऱ्याचा आरोप, संरक्षक भिंत बांधून देण्याची मागणी




सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील सीना नदीला आलेल्या महापुरामुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. अनंक शेतकऱ्यांची पिकं वाहून गेली आहेत, तर काही शेतकऱ्यांच्या जमिनीच वाहून गेल्या आहेत. त्यामुळं आता जगायचं कसं असा प्रश्न निर्माण झाला आहे.

माढा तालुक्यातील दारफळ या गावातील शेतकऱ्यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. या गावातील विनोद मच्छिंद्र बारबोले या शेतकऱ्याचे दीड एकर जमिन पुराच्या पाण्यात वाहून गेलं आहे. साधारण २० फुटाचा खड्डा जमिनीला पडला आहे. ही सर्व परिस्थिती प्रशासनाच्या चुकीमुळं झाल्याचा आरोप बारबोले यांनी एबीपी माझाशी बोलताना केला आहे.

विनोद बारबोले यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या वरील शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत प्रशासनाने भिंत बांधण्याचे काम पूर्ण केले आहे. पण माझ्या शेतालगत या भिंतीचे काम प्रशासनाने पूर्ण केले नाही. त्यामुळेच माझ्या शेतात पाणी गेलं आणि जमिन वाहून गेल्याची माहिती बारबोले यांनी सांगितली. २०२१ मध्ये ही भिंत बांधली आहे. तेव्हापासून जमिनीचं नुकसान होत आहे. त्यामुळं सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देऊन माझ्या शेतात संरक्षण भिंतं बांधून द्यावी अशी मागणी बारबोले यांनी केली आहे. २०२१ पासून बारबोले हे यासाठी लढा देत आहेत. मात्र, अद्याप त्यांची कोणतीही दखल घेतली नसल्याची माहिती बारबोले यांनी दिली आहे. बारबोले यांच्याकडे आठ एकर क्षेतत्र आहे. १७० फूट रुंदी आणि ६०० फूट लांबीचे माझे शेत आहे. यामधील दीड एकर क्षेत्र पूर्ण वाहून गेलं आहे. बारबोवे यांच्या दोन मुलांचे शिक्षण सुरु आहे. सरकारनं तातडीने मदत करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. शेतातील २० ते २२ फूट माती वाहून गेली शेतातील २० ते २२ फूट माती वाहून गेली आहे. त्यामुळं ही जमिन व्यवस्थीत होण्याची शक्यता फार कमी आहे. २०२१ पासून सातत्याने माझे नुकसान होत असल्याची माहिती विनोद बारबोले यांनी दिली आहे.पाटबांधारे विभागाने पाहणी करावी आणि भिंत बांधून द्यावी. भितं बांधल्यापासूनच माझे शेत वाहून जात असल्याची माहिती बारबोले यांनी दिली आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी सरकारनं भरीव स्वरुपाची मदत करावी, अशी मागणी पूरग्रस्त भागील शेतकरी करत आहेत.

# कापसातील पातेगळ आणि बोंडगळचे व्यवस्थापन



कापूस पिकात आपत्कालीन परिस्थितीत वेगवेगळ्या कारणांमुळे पातेगळ आणि बोंडगळ सारख्या समस्या उद्भवतात. या समस्येचे विविध कारणे आणि त्यावरील व्यवस्थापन उपाय जाणून घेतल्यास त्यावर उपाययोजना करून नुकसान टाळता येते.

पातेगळ आणि बोंडगळ होण्याची कारणे : जास्त किंवा कमी झालेला पाऊस पातेगळ आणि बोंडगळ होण्यास कारणीभूत ठरते, तसेच तापमानातील अचानक झालेला चढउतार हे सुद्धा महत्वाचे कारण आहे. कापूस पिकाच्या वाढीच्या अवस्थेत पोषक घटकांसाठी होणारी स्पर्धा. कापूस पिकात होणारा किडींचा प्रादुर्भाव. शेतात पाणी साचून राहणे किंवा जमिनीतील ओलावा कमी होणे. सूर्यप्रकाशासाठी होणारी पिकांची स्पर्धा

पातेगळ आणि बोंडगळ समस्येवर उपाय : आकस्मिक परिस्थितीत कापूस पिकात पुरेसे अन्न आणि पाणी व्यवस्थापन करावे.

पिकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. नॅफ्थाइल ॲसिटिक ॲसिड २० पीपीएम याप्रमाणात फवारणी करावी. पिकाचे वाढ नियंत्रण करून शेंडा खुडणी करावी. पोटॅशियम नायट्रेटची १ टक्के याप्रमाणात फवारणी करावी. पिकामध्ये भरपूर हवा व सूर्यप्रकाश मिळावा म्हणून व्यवस्थापन करावे. पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने दुसरी आणि तिसरी वेचणी करावी. कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेत न्यावे व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा, जेणेकरून त्यात दडलेल्या किडींच्या अवस्था नष्ट होतील.

# ऑगस्टच्या नुकसान भरपाईचे ६० कोटी आले पण त्यातील साडेतेवीस कोटी ईकेवायसीत अडकले

सोलापूर : ऑगस्ट महिन्यात उत्तर, दक्षिण व अक्कलकोट तालुक्यातील १० मंडळांत झालेली अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या पीक नुकसानीचे ५९ कोटी ८० लाख रुपये मंजूर झाले. पैसे मंजूर असले तरी शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होण्यासाठीच्या अडचणी काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. पात्र ६० हजार शेतकऱ्यांपैकी बावीस हजार शेतकऱ्यांचे पैसे ईकेवासीसाठी अडकले, तर ११६७ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९६ लाख रुपये जमा झाले आहेत.

ऑगस्ट महिन्यात सोलापूर जिल्ह्यात एकूण १७५ मि.मी. १६३ टक्के इतका पाऊस पडला होता. याशिवाय उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व व अक्कलकोट तालुक्यातील १० मंडलांत अतिवृष्टी झाली होती. या मंडलात पीक नुकसानीचे पंचनामे करण्यात आले होते. तसेच भीमा व इतर नद्यांना आलेल्या पुरामुळे पीके पाण्यात जाऊन नुकसान झाले होते. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या ६० हजार इतकी आहे. या शेतकऱ्यांना ५९ कोटी ७९ लाख १६ हजार रुपये मंजूर आहेत. ऑगस्टमधील नुकसानीची १२ सप्टेंबरला रक्कम मंजूर झाली. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात पुन्हा पुन्हा अतिवृष्टी व नुकसानकारक पाऊस पडत राहिला व सीनेला पूर आला.




यामध्ये संपूर्ण प्रशासन अडकले. यामुळे तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांची खाती ऑनलाईन टाकण्यास विलंब होत आहे. गुरुवारी दुपारपर्यंत जिल्ह्यातील २२ हजार ७३४ बँक खाती ऑनलाईन झाली, तर त्याची रक्कम २४ कोटी ४० लाख ४८ हजार रुपये होतात. त्यापैकी ११६७ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९६ लाख ८६५ रुपये जमा झाल्याचे सांगण्यात आले. २१ हजार ७५१ शेतकऱ्यांचे २३ कोटी ४१ लाख केवळ ई-केवायसी केली नसल्याने पैसे जमा होत नाहीत.

जुन्या निकषानुसार मदत..

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति दोन हेक्टरपर्यंत जिरायत प्रति हेक्टर आठ हजार पाचशे, बागायत १७ हजार, तर फळबागांसाठी बावीस हजार पाचशे प्रमाणे रुपयाने पैसे जमा केले जात आहेत. पंढरपूर तालुक्यातील ११५४, उत्तर तालुक्यातील दहा, तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील तीन शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत. मंजूर ६० कोटींमध्ये उत्तर तालुक्यात सर्वाधिक २६ कोटी तीन लाख, अक्कलकोट तालुक्यात १४ कोटी चार लाख, दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी १२ कोटी १४ लाख रुपये, तर पंढरपूर तालुक्यासाठी चार ७० लाख ५० हजार रुपये मंजूर आहेत. इतर तालुक्यासाठी यापेक्षा कमी रक्कम ऑगस्ट महिन्यातील नुकसानीची मंजूर आहे.

# बटाटा लागवड तंत्रज्ञान



बटाटा पिकाचे लागवड पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, बीड, औरंगाबाद आणि नागपूर या जिल्ह्यात केली जाते. बटाट्यामध्ये प्रथिने, चुना, फॉस्फरस या सारखी खनिजे, ब आणि क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात. बटाट्याचा उपयोग खाद्य पदार्थाशिवाय अनेक उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात होतो.

हवामान : बटाटा हे थंड हवामानातील पिक आहे. या पिकास सरासरी १६ ते २१ सेल्सिअस तापमान लागते. पिकाच्या सुरवातीच्या काळात २४ सेल्सिअस पोषक असून बटाटे पोसण्याच्या काळात २० सेल्सिअस तापमान अनुकूल असते. बटाटे लागवडीच्या वेळी उष्ण हवामान व बटाटे पोसण्याचे वेळी थंड हवामान या पिकास पोषक असते.

जमीन : मध्यम ते हलक्या गाळाच्या जमिनीत बटाट्याची लागवड चांगल्या रीतीने करता येते. जमीन कसदार भुसभुशीत व उत्तम निचऱ्याची असावी. जमिनीचा सामू ६ ते ८ च्या दरम्यान असावा.

पूर्वमशागत : जमीन नांगरानी २० ते २५ सेंमी नांगरावी. १ महिनाभर जमिनीस उन्हाची ताप द्यावी. पुन्हा १ आडवी नांगरणी करावी. ढेकळे फोडण्यासाठी व जमीन समपातळीत आणण्यासाठी कुळवाच्या दोन तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी, जमिनीत हेक्टरी ५० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरावे.

लागवडीचा हंगाम : बटाट्याची लागवड खरीप हंगामात जून, जुलै महिन्यात करतात व रब्बी हंगामात ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यात करतात.

वाण : कुफरी लवकर - ही ६५ ते ८० दिवसात तयार होणारी जात असून खरीप व रब्बी हंगामात घेतली जाते. या जातीचे बटाटे पांढरे शुभ्र आकर्षक वव मोठे असतात. या जातीचा बटाटा साठवणुकीत चांगला टिकतो. हेक्टरी उत्पादन २०० ते २५० क्विंटल असते. कुफरी चंद्रमुखी - ही जात ९० ते १०० दिवसात तयार होते. या जातीचे बटाटे लांबट गोल व फिकट पांढरे असतात. साठवणुकीस ही जात उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन २५० क्विंटल पर्यंत मिळते. कुफरी सिंदुरी - ही जात १२० ते १३५ दिवसात तयार होते. या जातीचा रंग फिकट तांबडा असून बटाटे मध्यम व गोल आकारचे असतात. ही जात साठवणुकीस उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन ३०० क्विंटल पर्यंत मिळते. या शिवाय कुफरी बादशाह, कुफरी कुबेर, कुफरी ज्योती, अलंकार, कुफरी चमत्कार या जाती लागवडीस योग्य आहेत

बियाणाचे प्रमाण : बियाणे उत्तम दर्जाचे असावे. हेक्टरी १५ ते २० क्विंटल बियाणे लागवडीस पुरेसे असते. लागवडीपूर्वी बियाणे कॅप्टन ३० ग्रॅम आणि बविस्टोन १० ग्रॅम १० लिटर पाण्यात ५ मिनिटे बुडवून व नंतर लागवडीसाठी वापरावी.

लागवड : सरासरी बेण्याचे वजन जास्तीत जास्त २५ ते ३० ग्रॅम असावे. बेण्याचा आकार म्ध्याम असून बटाट्याचे आकारमानानुसार दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सेंमी आणि दोन बियांमधील अंतर १५ ते २० सेंमी ठेवावे. ट्रॅक्टरच्या सह्हायाने सरी वरंबापद्धतीने लागवड करावी

खते व पाणी व्यवस्थापन : बटाटा पिकास लागवडीपूर्वीहेक्टरी १०० किलो नत्र, ६० किलो पालाशाची आवश्यकता असते. लागवडीनंतर १ महिन्याने ५० किलो प्रती हेक्टर नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी. बटाट्याची मुले जमिनीत वरच्या थरात वाढत असल्यामुळे या पिकास पाण्याच्या पातळीच्या वेळेस कमी पाणी द्यावे. लागवडीनंतर पहिले पाणी हलके द्यावे. जमिनीला लगतच्या फांद्या वाढून त्यांची टोके फुगीर होऊ लागल्यावर व बटाटा पोसण्याच्यावेळेस ६ ते ८ दिवसांच्याअंतराने पाणी द्यावे. पिकाची वाढ पूर्ण झाल्यावर पाण्याच्यापाळ्या कमी कराव्यात

आंतरमशागत : बटाट्याच्या आंतरमाशागतीत तण काढणे व खुरपणी या बरोबर भर देणे हे महत्वाचे काम आहे. तीन चार वेळा खुरपणी करून जमीन भुशभूशित ठेवावी. खताचा दुसरा हप्ता देताना झाडांना मातीचा भर द्यावी.

रोग व कीड : करपा - पानवर काळे ठिपके पडून पाने गळतात. बटाट्यावर खोलगट चट्टे पडतात. उपाय - डायथेनएम ३० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मर - मोठी झाडे पिवळी व मलूल दिसतात. बुंध्याजवळ जमिनीलगतच्याभागावर बुरशीची वाढ झालेली दिसते. उपाय- पिकांची फरपालट आणि नियमित पाण्याच्या पाळ्या देऊन रोग आटोक्यात आणता येतो. जमिनीत नँप्थलीन किंवा फॉरमँलिन(१:५०) मिसळून दिल्यास रोगाचे बीज मरते. चारकोल रॉट किंवा खोक्या रोग - या रोगाचा प्रसार जमिनीतून होतो. जमिनीचे तापमान ३२ सेल्सिअस पेक्षाअधिक असल्यास ते रोगजतूना पोषक ठरते. या रोगामुळे साठवणीतील बटाटे नसतात. उपाय- जमिनीचे तापमान ३२ सेल्सिअस च्या वर चढण्यापूर्वी बटाट्याचीकाढणी करावी किंवा पाणी देऊन जमिनीचे तापमान कमी ठेवावे.

कीड : देठ कुडतरणारी अळी - राखी रंगाची अळी असून रात्रीचे वेळी खोडाजवळील भाग कुरतडतात. पाने व कोवळे देठ खातात. उपाय - या किडीच्या बंदोबस्तासाठी क्लोरेड एम ५ % पावडर हेक्टरी ५० किलो जमिनीवर सायंकाळी धुराळावी मावा व तुडतुडे - या किडीत पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. उपाय- लागवडीनंतर १५ दिवसांनी मिथिल डिमेटॉन १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून किंवा फॉस्फोमिडॉन ८५ डब्लू एमसी १० मिलि १० लिटर पाण्यात फवावरावे. बटाट्यावरील पंतग - ही किड बटाट्याचे अतोनात नुकसान करते. या किडीची सुरवात शेतातून होते. परंतु नुकसान हे साठवणुकीच्या काळात दिसून येते. या किडीच्या आळया पानात देठात व खोडात शिरून पोखरतात. आळया बटाट्यात शिरून आतील भाग पोखरून खातात. उपाय - या किडीच्या बंदोब्स्तासाठी कार्बारील ५० डब्लू.पी. १.५ किलो ७५० पाण्यात मिसळून फावरावे.

काढणी व उत्पादन : सर्व सुधारित तंत्राचा उपयोग करून बटाट्याचे पिक घेतल्यास लवकर तयार होणार्या जातीचे उत्पादन हेक्टरी २०० क्विंटल व उशिरा तयार होणाऱ्या जातीचे उत्पादन हेक्टरी २५० ते ३०० क्विंटल पर्यंत होऊ शकते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६६ : आग्र्याहून सुटका झाल्यानंतर शिवाजीमहाराज राजगड येथे सुखरुप पोहोचले.
१७८६ : ब्रिटीश इस्ट इंडियाचे अधिकारी लॉर्ड कॉर्नवॉलिस हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले.
१८५७ : कॅलिफोर्निया गोल्ड रश मध्ये सापडलेले १३-१५ टन सोने घेऊन जाणारे एस.एस. सेंट्रल अमेरिका हे जहाज सोने व ४२६ प्रवाशांसह बुडाले.
१८७३ : टाइपराइटर पहिल्यांदा ग्राहकांना विकण्यात आले.
१९१९ : ॲडॉल्फ हिटलर यांनी जर्मन वर्कर्स पार्टी मध्ये प्रवेश केला.
१९३० : विल्फ्रेड होंड्स यांनी आपला शेवटचा म्हणजे १११० वा प्रथमश्रेणी क्रिकेट सामना खेळला.
१९४८ : भारतीय सैन्य हैदराबाद संस्थानच्या हद्दीत शिरले. जुलुमी रझाकारांच्या मदतीने स्वतंत्र राहण्याचा निजामाचा हट्ट मोडून या फौजांनी हैदराबाद ताब्यात घेतले. हैदराबाद मुक्तीच्या या कारवाईचे वर्णन 'पोलिस ॲक्शन' असे केले जाते.
१९५९ : 'ल्यूना-२' हे मानवविरहित रशियन अंतराळयान चंद्रावर उतरले.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी डार्डानेल्स खाडी पार केली.
१९८० : तुर्कस्तानमधे लष्करी उठाव
१९९८ : डॉ. जयंत नारळीकर यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार प्रदान
२००२ : मेटसॅट या भारताच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
२००५ : हाँगकाँगमधील डिस्नेलँड सुरू झाले.
२०११ : हल्ल्यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एक समर्पण समारंभ पार पडल्यानंतर न्यूयॉर्क शहरातील स्मारक संग्रहालय सर्वांसाठी सुरु करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९४ : फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला यांचा जन्म.
१६८३ : पोर्तुगालचा राजा अफोन्सो सहावा यांचा जन्म.
१७९१ : विद्युतशक्तीचे शास्रज्ञ मायकल फॅरेडे यांचा इंग्लंड येथे जन्म.
१८१८ : गॅटलिंग गन चे संशोधक रिचर्ड जॉर्डन गॅटलिंग यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८०३)
१८९४ : विभूतीभूषण बंदोपाध्याय जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक. 'पथेर पांचाली', 'अपराजित', 'आरण्यक' या त्यांच्या काही उत्कृष्ट कलाकृती होत. 'इच्छामती' या त्यांच्या कादंबरीला रविन्द्र पुरस्कार देण्यात आला. (मृत्यू: १ नोव्हेंबर १९५०)
१८९७ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ मार्च १९५६)
१९१२ : फिरोझ गांधी इंदिरा गांधी यांचे पती, पत्रकार व राजकारणी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९६०)
१९४८ : मॅक्स वॉकर ऑस्ट्रेलियन क्रिकेट आणि फूटबॉलपटू (मृत्यू:)
१९७७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू नेथन ब्रॅकेन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : ऑस्ट्रेलियाचे चौथे पंतप्रधान जॉर्ज रीड यांचे निधन.
१९२६ : विनायक लक्ष्मण भावे मराठी साहित्य संशोधक, ग्रंथकार आणि 'महाराष्ट्र सारस्वत' या मराठी साहित्येतिहास ग्रंथाचे लेखक, १८९३ मध्ये त्यांनी ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. (जन्म: १८७१)
१९५२ : रामचंद्र गणेश कुंदगोळकर तथा 'सवाई गंधर्व' हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांचे शिष्य, पं भीमसेन जोशी आणि गंगुबाई हनगळ यांचे गुरू, दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली. (जन्म: १९ जानेवारी १८८६)
१९७१ : जयकिशन डाह्याभाई पांचाळ 'शंकर-जयकिशन' या संगीतकार जोडीतील संगीतकार (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते सतीश दुभाषी यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: १४ डिसेंबर १९३९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री शांता जोग यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: २ मार्च १९२५)
१९९२ : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (जन्म: ३१ डिसेंबर १९१०)
१९९३ : अमेरिकन अभिनेता रेमंड बर यांचे निधन.
१९९६ : पं. कृष्णराव रामकृष्ण चोणकर मराठी व गुजराती संगीत नाट्य सृष्टीतील गायक अभिनेते, एक तपाहून अधिक काळ 'गंधर्व नाटक मंडळी'मध्ये नटसम्राट बालगंधर्वांचे नायक म्हणून त्यांनी काम केले. (जन्म:)
१९९६ : पद्मा चव्हाण चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री, स्त्रीसौंदर्याचा एक अनोखा नमुना म्हणून ख्याती असलेल्या पद्मा चव्हाणांच्या नाटकांच्या जाहिरातींत त्यांच्या नावाआधी 'मादक सौंदर्याचा ॲटम बॉम्ब' असे छापले जात असे. (जन्म: ७ जुलै १९४८)





# कोणतेही काम सकारात्मकतेने सुरु करा- बालचंद्रन

जालना । प्रतिनिधी

जीवनातील कोणतेही काम किंवा निर्णय सकारात्मकतेने सुरू केल्यास मनुष्य जीवनात यशस्वी होतोच असा विश्वास लेफ्टनंट कर्नल के अरविंद बालचंद्रन यांनी व्यक्त केला जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या करियर गायडन्स या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे प्रकल्प संचालक सुनिल कुमार पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तूबाकले, कॅफे डॉ. सुधीर कुमार चाटे, कार्यकारी अभियंता सविता सलगर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी उदयसिंग राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

अरविंद बालचंद्रन यांनी आपल्या आयुष्यातील करण्यात आलेल्या प्रयत्नासोबतच भविष्यकालीन असलेल्या वेगवेगळ्या संधीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तुम्ही काय बनवू शकता यापेक्षा तुम्ही काय करू शकता यावर जास्त विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. फिल्मी जग व वास्तविक जग यामध्ये मूलभूत फरक असून विद्यार्थ्यांनी सकारात्मकतेने विचार करून सोशल मीडियाला




बाजूला ठेवून ध्येय निर्धारित करावे व सदरील निर्धारित केलेले ध्येय साध्य करण्यासाठी योग्य पद्धतीचे नियोजन करावे. कोणतीही गोष्ट करताना अडीअडचणी येतच असतात परंतु त्यावर मात करून जो आनंद मिळतो तो जीवनात सर्वस्व देणारा आनंदा असतो. त्यामुळे आपल्याला आनंद देणाऱ्या गोष्टीचा विचार करावा मेहनत केल्याने व संकल्प केल्याने उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होते. जी व्यवस्थापन करणार आहोत त्या गोष्टीचा इतिहास माहिती असणे आवश्यक असून त्या त्यानुसार मनुष्य कृती करत असतो. स्वतःचे नेतृत्व गुण विकसित करून आदर्श समाज घडविण्यासाठी आर्मीमध्ये मोठ्या प्रमाणात संधी असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलामुलींसाठी जिल्हा परिषदेच्या वतीने मोफत करियर मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सदरील करियर कॅलेंडर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित केले. करियर गायडन्स उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना देश-विदेशातील तसेच विविध क्षेत्रांतील करिअरच्या संधींबाबत योग्य दिशा व प्रेरणा मिळवून देणे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या उपक्रमातून मुलांना करिअर ची निवड करताना मदत होणार आहे. विविध विषयांवरील मान्यवर तसेच विविध क्षेत्रात शासकीय सेवेत कार्यरत असणारे अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे .प्रकल्प संचालक सुनील कुमार पठारे यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय करून दिला. कार्यक्रमास मुला मुलींची तसेच पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ट्रॅक्टर अडवणाऱ्या शेतकऱ्याचा बोडख्यात खून

जालना । प्रतिनिधी

शेतरस्त्यांवरील वाद ग्रामीण भागात नेहमीच पाहायला मिळतात काही ठिकाणी हे वाद आपसात मिटवले जातात, तर काही ठिकाणी कोर्टात पोहोचतात. मात्र, जालन्यातील हा वाद इतका विकोपाला गेला की त्यातून थेट जीवघेणी घटना घडली. या वादात एका ५५ वर्षीय शेतकऱ्याचा त्याच्याच भावकीतील लोकांनी खून केल्याचा प्रकार उघड झाला आहे.

गुरूवारी (९ ऑक्टोबर) घनसावंगी तालुक्यातील बोडखा येथे हा प्रकार घडला. शेतरस्त्याच्या जुन्या वादातून झालेल्या भांडणात बाबासाहेब विठ्ठल ढेरे (वय ५५) या शेतकऱ्याचा दिवसाढवळ्या खून करण्यात आला. हा वाद मागील काही वर्षांपासून सुरू होता, मात्र त्या दिवशी तो तीव्र झाला. घटनेच्या दिवशी बाबासाहेब ढेरे यांनी आरोपींचा ट्रॅक्टर अडवत, ''हा रस्ता तुमचा नाही, तुम्ही इकडून ट्रॅक्टर घेऊन जाऊ शकत नाही,'' असे सांगितल्यावर वाद पेटला. त्यातून झालेल्या हाणामारीत महादू ढेरे या मुख्य आरोपीने लोखंडी रॉडने बाबासाहेब ढेरे यांच्या डोक्यात वार केला. त्यानंतर इतर आरोपींनी, केशव देवीदास ढेरे, देवीदास बापूराव ढेरे, किसन बापूराव ढेरे आणि दिलीप किसन ढेरे, लोखंडी गज आणि काठ्यांनी मारहाण केली. यात बाबासाहेब ढेरे गंभीर जखमी होऊन जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडले आणि त्यांचा मृत्यू झाला.बाबासाहेब ढेरे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले पाहताच सर्व आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. घटनेची माहिती मिळताच नागरिक व मृताचे कुटुंबीय घटनास्थळी धावले आणि पोलिसांना कळवले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि बाबासाहेब ढेरे यांना शासकीय रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.या घटनेनंतर मृताची पत्नी शीलाबाई बाबासाहेब ढेरे यांनी घनसावंगी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी वर नमूद केलेल्या पाचही आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

## वीज कर्मचाऱ्यांच्या आंदोलनास भास्कर दानवे यांची भेट

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित वीज निर्मिती (महानिर्मिती) व वीज पारेषण (महापरेषण) कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी राज्य शासनाच्या वीज कंपन्यांचे खाजगीकरण करण्याच्या निर्णयाविरोधात सुरू केलेल्या आंदोलनास आज (दि.१०) रोजी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी भेट देऊन कर्मचाऱ्यांची भेट घेतली व त्यांच्या मागण्यांची सविस्तर माहिती जाणून घेतली.

या वेळी श्री.दानवे यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना सांगितले की, ''वीज सेवा ही जनतेच्या जीवनाशी थेट निगडित असून, कर्मचाऱ्यांच्या योग्य मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करील व वीज कंपन्यांतील अधिकारी, अभियंते व कर्मचारी यांनी केलेली मागणी लक्षात घेता या मागणीवर सकारात्मक तोडगा निघावा यासाठी मी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री.देवेंद्रजी



फडणवीस यांच्याशी चर्चा करून भेट घडून आणण्यासाठी प्रयत्नशील राहील असे आश्वासन त्यांनी दिले. या वेळी श्री. दानवे यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना सांगितले की, ''वीज सेवा ही जनतेच्या जीवनातील अत्यावश्यक सेवा असून, शासन व वीज कर्मचारी दोघेही जनतेच्या हितासाठीच कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासनापर्यंत योग्य मार्गाने पोहोचविण्यासाठी मी निश्चित प्रयत्न करीन असा विश्वास त्यांनी व्यक्त केला तसेच मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस हे जनहिताचा विचार करून निश्चितच योग्य निर्णय घेतील. या भेटीदरम्यान अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आंदोलन शांततापूर्ण आणि अनुशासित पद्धतीने सुरू असून शासनाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

## लातूर-अंबाजोगाई मार्गावर संभाजी सेनेचा रास्ता रोको

रेणापूर । प्रतिनिधी

रेणापूर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नदी नाल्याच्या पुरामुळे शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तेव्हा शासनाने सरसकट शेतक-यांना एकरी ५० हजार रुपयांची मदत देण्यात यावी यासह अन्य मागण्यांसाठी शुक्रवार दि १० रोजी सकाळी रेणापूर तालुका संभाजी सेनेच्या वतीने लातूर-अंबाजोगाई राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. रेणापूर तालुक्यात ऑगस्ट, सप्टेबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावात पूर परिस्थिती निर्माण होऊन पुराचे पाणी शेतात घुसल्याने शेतातील ऊस, सोयाबीन, तूर, व भाजीपाला तसेच फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

अनेक शेतक-याची पुरात जनावरे, शेती अवजारे पुरात वाहून गेली आहेत तर पुराच्या पाण्यामुळे अनेक शेतक-याच्या जमीनी व



रस्ते खरडून गेल्या आहेत . त्या बरोबरच अतिवृष्टीने अनेक घरांची पडझड झाली आहे. नदीकाठच्या शेतक-यांचे पंचनामे करताना अल्प भूधारकची अट घालून शेतक-यांना मदतीपासून वंचित ठेवले जात अशा अस्मानी संकटात सरकारने शेतक-यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहून शेतक-यांची संपूर्ण कर्ज माफी करावी , शेतक-यांना सरसकट ५० हजार रुपयांची मदत करावी. पुरात ज्या शेतक-याचे पशूधन व अवजारे वाहून गेली अशा शेतक-यांना दिड लाख रुपये तात्काळ मदत करावी, पीक विमा मंजूर करावा . यासह अन्य विविध मागण्यांसाठी रेणापूर तालुका संभाजी सेनेच्या वतीने लातूर अंबाजोगाई राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येऊन मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले.

## दिव्यांग लाभार्थींसाठी शिबीराचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडून संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांग लाभार्थींचे मासिक अर्थसहाय १ हजार ५०० रुपयांवरुन २ हजार ५०० रुपये करण्याच्या अनुषंगाने जालना शहरातील दिव्यांग लाभार्थ्यांची यादी तहसील कार्यालयातील नोटीस बोर्डवर डकविण्यात आली आहे. दिव्यांगासाठी मंगळवार दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जालना तहसील कार्यालयात शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी शिबीरात ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र, युडीआयडी कार्ड, अद्यावत आधारकार्ड व बँक पासबुकाच्या छायांकित प्रतिसह हजर रहावे, असे आवाहन तहसीलदार छाया पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## सोयाबीनचे भाव घसरले; शेतकरी अडचणीत-अनंतराव वैद्य

मंठा । प्रतिनिधी


तालुक्यात सिंचनाचा अनुशश असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी जिरायती शेती करता त्यामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांचे कापूस, सोयाबीन हेच मुख्य पीक आहे.आणि तेच शेतकऱ्यांच्या जगण्याचा आधार आहे.परंतु सोयाबीन आणि कापूस पिकाचे भाव वाढण्या ऐवजी दरवर्षी कमी होत आहेत.दरवर्षी भावाचा चढ-उतार भेडसावत आहे. २०१४ साली सोयाबीनचा दर क्विंटलमागे ४५०० रुपये होता, तर त्याच काळात खाद्यतेलाचा भाव ६५ रुपये प्रति लिटर होता. परंतु २०२५ मध्ये परिस्थिती पूर्णतः उलट झाली आहे आज सोयाबीनचा दर फक्त ३६०० ते ४००० रुपये इतका असून, खाद्य तेलाचा भाव मात्र तब्बल १४० रुपये प्रति लिटर पर्यंत गेला आहे.या दरातील तफावतीमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून, सरकारकडून दर स्थिर ठेवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शिवसेनेचे अनंतराव वैद्य यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.सोयाबीन उत्पादक शेतकरी सांगतात की, ''उत्पादन खर्च, मजुरी, खत, औषधे, ट्रॅक्टरचे इंधन सर्वच वाढले आहे. पण भाव मात्र उलट घसरले. आम्ही खाद्य तेलाचे मूळ उत्पादक शेतकरी आहे. तरीही खाद्य तेल महाग आणि आमचे उत्पादन स्वस्त हे अन्यायकारक आहे.''

अनेक शेतकरी संघटनांनी याबाबत केंद्र व राज्य सरकारकडे निवेदन देण्याची तयारी केली आहे. त्यांचा ठाम आग्रह आहे की सोयाबीनला हमीभाव किमान ७००० रुपये प्रति क्विंटल करण्यात यावा.तेल कंपन्यांवर नियंत्रण ठेवून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळावा.आयात कमी करून देशातील उत्पादनाला प्रोत्साहन द्यावे. दरम्यान, बाजारात सोयाबीनचा भाव स्थिर नाही. काही ठिकाणी ३६०० तर काही ठिकाणी ४२०० रुपये क्विंटलपर्यंतच दर आहे. व्यापारी आणि दलालांचे वर्चस्व वाढल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.शेतकऱ्यांचे मत स्पष्ट आहे ''सरकारने केवळ घोषणांवर न थांबता प्रत्यक्ष हस्तक्षेप करावा, अन्यथा येत्या हंगामात सोयाबीन लागवड कमी होईल आणि देशांतर्गत तेल उत्पादन आणखी घटेल. कापूस आणि सोयाबीनचा भाव पडतोय आणि खाद्य तेलाचा दर वरचेवर वाढतोय हा प्रश्न केवळ बाजाराचा नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वाशी जोडलेला आहे. सरकारने तातडीने ठोस पावले उचलून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तरच शेतकऱ्यांना दिवाळी गोड लागेल अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे अनंतराव वैद्य यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## पोलिस अधीक्षक साहेब; बालकांच्या मनातील दहशत संपवा!

बीड । प्रतिनिधी

बीडचे पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी पवनचक्की कंपन्यांची बाजू घेऊन शेतकऱ्यांची आर्थिक आणि मानसिक पिळवणूक सुरू ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना अक्षरशः वाऱ्यावर सोडलं आहे, असा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. डॉ. ढवळे म्हणाले, ''खाकी वर्दीचे ब्रीदवाक्य 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' आहे. या ब्रीदवाक्याचा सन्मान राखण्यासाठी तरी पोलिस प्रशासनाने निष्पाप बालकांवर हल्ला करणाऱ्या गुंडांची शहरभर धिंड काढावी.



अलीकडेच परळी तालुक्यातील नर्मदेश्वर गुरूकुलात अध्यात्माचे शिक्षण घेणाऱ्या ११ विद्यार्थ्यांवर बेल्ट आणि बांबूने निर्दय मारहाण करण्यात आली. या मुलांच्या अंगावर जखमेच्या खुणा उमटल्या आहेत. हल्लेखोरांनी गुरूकुलातील अध्यात्मिक साहित्य, मृदंगासह शैक्षणिक ग्रंथांची तोडफोड केली असून मोठे नुकसान केले आहे. अध्यात्म आणि संस्काराचे धडे घेणाऱ्या बाल वारकऱ्यांवरील हा हल्ला अत्यंत दुर्दैवी आहे. गुरूकुलात हैदोस घालणाऱ्यांनी मुलांच्या मनात निर्माण केलेली भीती आणि दहशत पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांच्या निदर्शनास येईल काय? आणि त्यांनी या घटनेची कठोर कारवाई करावी का नाही?'' असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १५५०/२०२५**

CNR No. MHBI020000033572025

**(मार्फत ॲड. ए. आर. बावचकर) घोंडाबाई महादेव कानडे व इतर १ वि. निरंक**

अर्जदार :- १. धोंडाबाई भ्र. महादेव कानडे, वय-५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. नाळवंडी ता. जि. बीड, २. महादेव पि. लिंबाजी कानडे, वय-६३ वर्षे, धंदा-शेती, रा. नाळवंडी ता. जि. बीड, विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ व २ यांनी या न्यायालयात मयत छाया पि. महादेव कानडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत छाया पि. महादेव कानडे यांचा मृत्यु दिनांक २९/०८/२०२५ रोजी माउली किटीकल सर्जीकल, बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची आई असून अर्जदार क्र. २ हे मयताचे वडील आहेत. मयत हा मृत्युसमयी अविवाही होता. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत छाया पि. महादेव कानडे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईत्तर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक 'लोकतंत्र' मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख २०/११/२०२५ आज दिनांक १० माहे ऑक्टोबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित — **क. लिपीक**

स्वाक्षरित — **अधिक्षक**, सहदिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

# विजयादशमी उत्सवानिमित्त जामखेड येथे पथसंचलन व शस्त्रपूजन उत्साहात

### सेवा, सुरक्षा व संघटन याचे एकत्रित दर्शन संघाची शताब्दी वर्षाच्या दिशेने वाटचाल

जामखेड । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या शताब्दी वर्षात पदार्पण करत असताना राष्ट्रकार्याची अविरत ज्योत तेवत ठेवत आहे. असंख्य स्वयंसेवकांनी राष्ट्रकार्याकरिता आपले जीवन समर्पित केले असून याच कार्याचे दर्शन विजयादशमीच्या उत्सवात पाहायला मिळाले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जामखेड येथे पथसंचलन व शस्त्रपूजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या संचलनात सुमारे २७० स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेशात सहभाग घेतला होता. बाजार समितीपासून महावीर भवनपर्यंत काढण्यात आलेल्या पथसंचलनाचे नागरिकांनी पुष्पवर्षाव व रंगोळीच्या स्वागताने मनापासून स्वागत केले.

महावीर भवन येथे शस्त्रपूजनानंतर कार्यक्रमास प्रारंभ झाला. या वेळी तालुका कार्यवाह मा. बाळासाहेब दळवी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख पाहुणे म्हणून



श्रीमती सीमाताई कुंदन गायकवाड (स्वच्छता दूत) व कॅप्टन लक्ष्मण भोरे उपस्थित होते. सीमाताई गेल्या वीस वर्षांपासून नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागात कार्यरत असून समाजसेवेचा आदर्श ठरल्या आहेत. तर कॅप्टन भोरे यांनी देशसेवेसाठी आपले जीवन अर्पण केले आहे. प्रमुख वक्ते मा. यशोवर्धन (आण्णा) वाळिंबे यांनी संघाचे शताब्दी वर्ष म्हणजे ''सेवा, सुरक्षा आणि संघटन'' या त्रिवेणी संगमाचे प्रतिक असल्याचे सांगितले. ते म्हणाले, ''स्वदेशी, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन व पर्यावरण या पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून स्वयंसेवक घराघरात प्रबोधन करणार आहेत. स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढविणे हे राष्ट्रनिर्मितीचे बळ आहे.वाळिंबे पुढे म्हणाले की, ''आज परकीय शक्ती देशात जात, प्रांत, भाषा यांच्या माध्यमातून फुट पाडण्याचे डाव खेळत आहेत. या अदृश्य शक्तींना वेळेत ओळखून त्यांचा डाव हाणून पाडला पाहिजे. देश एकत्रित राहावा म्हणूनच डॉ. हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली. त्या छोट्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे आणि 'राष्ट्रप्रथम' ही भावना जपत संघ अखंड कार्यरत आहे.

राज्य लोकतंत्र
रविवार, दि.१२ ऑक्टोबर २०२५ | ६

# तुम्हाला लढल्याशिवाय काहीच मिळणार नाही -राजेश घोडे

## ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी ऊसतोड कामगार संवाद सभेचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

ऊसतोड कामगारांच्या प्रश्नासह बहुजनांच्या प्रश्नासाठी महाराष्ट्रामध्ये आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून लढत असणारे आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक १०-१०-२०२५ रोजी ऊसतोड कामगार संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सध्या महाराष्ट्रामध्ये विविध संघटनेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या संदर्भात काम सुरू आहे मात्र आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून प्रमुख अध्यक्ष राजेश घोडे यांच्या नेतृत्वाखाली ऊसतोड कामगार यांच्या प्रश्नासह बहुजनांच्या प्रश्नावर राज्यभरात आंदोलने, निदर्शने, व मोर्चे होत आहेत. त्याच प्रकारे आज शुक्रवार दिनांक १०-१०-२०२५ रोजी वडवणीच्या बचत गट भवनमध्ये सकाळी ११:०० वाजता ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी ऊसतोड कामगार संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांचे अध्यक्ष राजेश घोडे हे होते तर विशेष उपस्थिती म्हणून संजय तिडके ऊसतोड कामगारांचे नेते, तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये सिद्धार्थ शिनगारे, अरुण आव्हाड, बबनराव मांजरे, पत्रकार अशोक निपटे,अशोक ढगे, नाना भिसे, कृष्णा पाटोळे, पिंटू डोंगरे, प्रकाश राठोड, परमेश्वर उजगरे, राजेश कांबळे, रावसाहेब राऊत, शेख अकबर भाई, अशोक साबळे, प्रदीप साळवे, किसन भिसे, विलास कारके, लक्ष्मण आव्हाड, पिंटू आढागळे, करण भिसे, मंगेश शिंदे,जावेद पठाण,अभिषेक हातागळे, महादेव साळवे,अंकुश आडागळे,



कांताबाई इचके, सोमित्रा आवाड,कौसाबाई आवाड, प्रकाश मुजमुले, रतन मुजमुले, जयदत्त आव्हाड, बाबुराव मुजमुले, सुरेश लोंढे, विलास शिंदे, सिद्धार्थ भाग्यवंत, नितीन मोरे व अशोक लोंढे यांच्यासह महिला पुरुष व आझाद क्रांती सेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शाहीर प्रदीप साळवे यांनी उत्कृष्ट असे गीत गायन केले या गीतामुळे कार्यकर्त्यांच्या मध्ये नवी संजीवनी निर्माण झाली. त्याचबरोबर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम शिंदे यांनी केले. यावेळी

ऊसतोड कामगारांच्या संदर्भात बोलताना प्रस्ताविक किसन भिसे यांनी केले तर रावसाहेब राऊत, अशोक निपटे, अशोक ढगे, संजय तिडके यांनी जोरदार भाषणाच्या माध्यमातून प्रशासनावर तोफ डागली. यापुढे बोलताना सिद्धार्थ शिनगारे यांनी असे सांगितले की, ऊसतोड कामगार हे सोळा तास काम करतात मात्र संविधानाने आठ तास काम करण्याचे अधिकार सर्वांना दिलेले आहेत. मग ऊसतोड कामगारांनी सोळा तास का काम करावे? इतर ठिकाणी तासावर काम केले जातात मात्र ऊसतोड कामगारांकडून टनावर काम करून घेतल्या जाते. म्हणून ऊसतोड कामगार ही ओळख पुसून टाकण्यासाठी संघटित होणे महत्त्वाचे आहे. आणि त्याचबरोबर शिक्षण घेणे तेवढीच काळाची गरज आहे. यानंतर आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे यांनीही ऊसतोड कामगारांच्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले ते म्हणाले की, आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून तुम्हाला लढल्याशिवाय काहीच मिळणार नाही. ऊसतोड कामगारांची साधी नोंद सुद्धा कारखाना करून घेत नाही किंवा ऊसतोड कामगारांना साधा विमा सुद्धा देऊ शकत नाही अपघाती मृत्यू झाला तर त्या ऊसतोड कामगारांची कुठेही नोंद नसते त्याला कोणीही भरपाई मिळवून देत नाही याच्यासाठी नेता निवडायचा झाला तर आपलाच निवडा इतरांच्या मागे पळू नका आणि कारखानदारांना तर मुळीच नेता म्हणून निवडू नका कारण ते तुम्हाला कामाच्या संदर्भात कापल्याशिवाय सोडणार नाहीत.

## सामाजिक उपक्रमांनी विष्णू घुले यांचा वाढदिवस साजरा

### नरसिंह मंदिरात आरती, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड, शैक्षणिक साहित्य वाटप

केज । प्रतिनिधी

केज पंचायत समितीचे सभापती विष्णू घुले यांचा वाढदिवस यंदा सामाजिक सेवेद्वारे अनोख्या पद्धतीने शुक्रवारी (दि.१०) साजरा करण्यात आला. सर्वत्र अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांना आलेल्या संकटाची जाणीव ठेवून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.





लोकनेत्या, राज्याच्या पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, मा.खा. डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णू घुले हे सक्रियपणे राजकारण, समाजकारण करत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केज तालुक्यातील तरनळी येथील सुप्रसिद्ध श्री नरसिंह मंदिरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांना आलेले नुकसान दूर व्हावे, ही प्रार्थना करत श्री नरसिंह देवाची आरती करण्यात आली. त्यानंतर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम ◀◀ पान २ वर

## आज मायक्रो ओबीसी, बलुतेदार-अलुतेदार समाजाच्या समान न्याय आणि हक्कांसाठी चिंतन परिषदेचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मायक्रो ओबीसी, बलुतेदार-अलुतेदार समाजाच्या समान न्याय आणि हक्कांसाठी चिंतन परिषदेचे आयोजन आज रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी अंबाजोगाईत करण्यात आले आहे. तरी या चिंतन परिषदेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

अंबाजोगाई शहरातील स्व.विलासराव देशमुख नगर परिषद सभागृह, अंबाजोगाई (जि.बीड) या ठिकाणी आज रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रो सकाळी ११ वाजता मायक्रो ओबीसी, बलुतेदार-अलुतेदार समाजाच्या समान न्याय आणि हक्कांसाठी चिंतन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार संजय केनेकर (सदस्य, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य.) तर यावेळी प्रविणजी जानोरकर (संत गाडगेबाबा यांचे वंशज), सचिनजी साठे (साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांचे नातू) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजकिशोर मोदी (माजी नगराध्यक्ष, नगरपरिषद, अंबाजोगाई.) हे असून याप्रसंगी शशिकांत आमणे (संस्थापक अध्यक्ष, बलुतेदार-अलुतेदार संघ.), जानकीराम पांडे (प्रदेशाध्यक्ष, बेलदार समाज संघटना.) यांचे ही मार्गदर्शन लाभणार आहे. तर प्रा.विजय रायमल, परशुराम इंगोले, बालाजी सिंगे, प्रशांत डोरले, दिलीप सोनवणे, डॉ.धर्मराज चव्हाण, विलास जावळे, रामेश्वर शिंदे, विजय पोहनकर, अमृता पवार, शुभम डहाके, अनंत उमाटे, विजय देवडे, भुमन्ना अक्केमवाड, मुकेश शिवगण, सुरेश धोत्रे, कैलास गोसावी, अतुल लोहार, सुदर्शन बोराडे, सुरेश असलेकर, ॲड.किशोर गिरवलकर, कलीम जहांगीर, राजेश पंडित, अक्षय शिंदे आणि इतर मान्यवर समाजनेते यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.तरी या चिंतन परिषदेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक भीमराव जगन्नाथ दळे (प्रदेशाध्यक्ष, अखिल भारतीय बलुतेदार-अलुतेदार विकास परिषद, अंबाजोगाई (जि.बीड), प्रकाश वेदपाठक, पत्रकार दत्तात्रय अंबेकर, पत्रकार अशोक दळवे, संजय तेलंग, सय्यद अमजत ◀◀ पान २ वर

## रामलिंग पतसंस्थेकडून सभासदांना १५ टक्के लाभांश व किराणा किट वाटप

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ता. वडवणी यांच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी दिपावली सणाच्या पूर्वी संस्थेच्या सभासदांना १५ टक्के प्रमाणे लाभांश व किराणा किट वाटपाचा शुभारंभ काल दि. १०/१०/२०२५ शुक्रवार रोजी श्री एम.एस.तोटावार साहेब जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, याच्या हस्ते व तसेच श्री आर.एस.ठोसर साहेब सहकार



अधिकारी बीड,श्री बी.एस.गायकवाड साहेब सहाय्यक निबंधक वडवणी, यांच्या प्रमुख उपस्थितीत, संस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे, व सर्व संचालक मंडळ या मान्यवरांच्या हस्ते उपस्थित सभासदांना १५ टक्के लाभांश व किराणा किट वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना चेअरमन नारायणराव डिगे यांनी रामलिंग सहकारी ◀◀ पान २ वर



## छोटेवाडी येथे शेकापचा तब्बल दिड तास रास्ता रोको

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटीवाडी येथे मोठीवाडी चौकात दिनांक ११ अक्टोबर शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजता शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई, पुरग्रस्तांना एकरी लाख रुपये नुकसान भरपाई, संपूर्ण कर्जमाफी, १००% पिक विमा द्या,भूमिहीनांना २५ हजार रुपये सहानुभूतीपर अनुदान द्या.या मागण्यासाठी तब्बल दिड तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी केली यावेळी वाहनाच्या दुर दुर रांगा लागल्या होत्या. यावेळी तहसील प्रशासनाने आंदोलकाच्या मागण्याचे निवेदन स्वीकारले.यावेळी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

## पिंपळनेर पोलिसांची तिर्रट जुगारावर कारवाई, पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलिसांनी ११ ऑक्टोबर रोजी एका गुप्त माहितीच्या आधारे तिरंट नावाचा जुगार खेळणाऱ्या ५ जणांवर यशस्वी कारवाई केली आहे. या कारवाईत २ लाख ७६ हजार ५१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे कार्यरत गोपनीय अंमलदार पोशि/४६८ संतोष वामन तावरे यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, म्हाळसजवळा ते पिंपळनेर जाणाऱ्या रस्त्यावर सारंग खांडे यांच्या शेतात चिंचेच्या झाडाखाली काही इसम पैशांवर पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली होती

प्रभारी अधिकारी सपोनि घुगे यांना ही माहिती कळवल्यानंतर, पोउपनि अर्जुन गोलवाल, ग्रेड पोउपनि. दिगांबर मेखले आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने १४.३५ वाजता खाजगी वाहनाने घटनास्थळी छापा टाकला.

पोलीस पथकाला पाहताच जुगार खेळणारे पाच इसम पळून जाण्याच्या ◀◀ पान २ वर

## आष्टी तहसील कार्यालयात सोमवारी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आरक्षण सोडत

आष्टी । प्रतिनिधी


महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदींनुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणासाठी पध्दत व चक्रानुक्रम) नियम २०२५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रातील जागांसाठी आरक्षण सोडले जाणार आहे.

यासाठी आष्टी तहसील कार्यालयात सोमवार दि. १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सभा तहसील कार्यालय येथील हॉलमध्ये दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सभेत अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती/नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा सोडत पद्धतीने निश्चित करण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे, त्यांनी सोमवारी उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## आयुर्वेदातील संशोधनासाठी शासनाचे अनुदान विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा -डॉ.जाई किरण किनी

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या संकल्पनेतून व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने आदित्य आयुर्वेद महाविद्यालयात "आरोग्यशास्त्रातील आजच्या आधुनिक कालानुरूप संशोधन" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यशाळेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या रिसर्च कौन्सिल मेंबर व केंद्र शासन आयुष रिसर्च ॲडव्हायझरी कमिटी मेंबर असलेल्या मुंबईच्या डॉ. जाई किरण किनी यांना प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी " " या विषयावर विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.

सकाळी १०:३० वाजता धन्वंतरी पूजन व स्तवनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्यानंतर चार सत्रात ही कार्यशाळा पार पडली. सुरुवातीच्या सत्रात संशोधनाची व्याख्या, गरज आणि प्रकार यांवर त्यांनी सखोल विवेचन ◀◀ पान २ वर

## गेवराई येथे शूरवीर जिवाजी महाले यांची ३६० वी जयंती साजरी



गेवराई प्रतिनिधी

शूरवीर जिवाजी महाले यांची ३६० वी जयंती संत सेना महाराज मंदिर सावता नगर गेवराई, तालुका गेवराई जिल्हा बीड येथे मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. प्रथम गेवराई तालुका अध्यक्ष नागेश पंडित यांच्या हस्ते विठ्ठल रुक्माई व संत शिरोमणी सेनाजी महाराज यांच्या मूर्ती पुष्पमाला अर्पण करून शूरवीर जिवाजी महाले यांच्या प्रतिमेची पूजा करून त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी कॅप्टन ◀◀ पान २ वर

## फुलचंद पान विक्री करताना पकडले बीड शहर पोलीसांची पहिली कारवाई

बीड । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून 'फुलचंद पान' या नावाखाली विक्री होणाऱ्या पदार्थामुळे युवक व अल्पवयीन मुलांमध्ये नशेचे प्रमाण वाढत असल्याची चर्चा होत होती. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी संबंधित बाबींचा तपास करून अशा विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

या आदेशानुसार बीड शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी १९.१० वाजेच्या सुमारास सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरातील राज दरबार व टीम ७५ या पान टपऱ्यावर छापा टाकला असता, टपरीवर फुलचंद पान विक्री होत असल्याचे आढळून आले. तपासणीदरम्यान त्या ठिकाणी नशा निर्माण करणारे रसायनयुक्त पावडर जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणात संबंधित राज दरबार पान टपरीचे अनिरुद्ध गौतम डोळसे वय २२ वर्ष राहणार गया नगर जालना रोड व पान टपरी चे मालक रोहन अशोक मुळूक वय २२ वर्ष राहणार शिवाजीनगर बार्शी रोड बीड तसेच टीम ७५ या पान टपरी चे चालक करण पद्माकर वाकचौरे वय २० वर्ष राहणार अंकुश नगर जुना चाराठा रोड बीड टपरीचे मालक नामे किशोर भानुदास तांदळे वय २६ वर्ष राहणार गल्ली नंबर १६ कालिका नगर बीड यांना ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे, गणेश कुमावत आणि पोलीस अंमलदार पोलीस हवालदार १८०४ बावनकर पोलीस हवालदार १४६९ शेख, पो.शि. ३७५ शिंदे, पोलीस शिपाई १००२ इलियास शेख यांनी केली आहे.

## युवराज भुंबे यांच्या निष्कलंक सेवाकार्याचा सार्थ अभिमान -खा.सोनवणे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय सेनेत हवालदार या पदावर १८ वर्षे आणि बीड जिल्हा पोलिस हवालदार या पदावर १७ वर्षे असे एकूण ३५ वर्षे देशसेवा करून नुकतेच दिनांक ३० सप्टेंबर रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले युवराज नारायण भुंबे यांच्या सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे मान्यवरांच्या उपस्थितीत बुधवार, दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी तालुक्यातील डिघोळ अंबा येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते.





या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार बजरंगबप्पा सोनवणे हे तर प्रमुख पाहुणे म्हणून राजकिशोर मोदी सौ.भाग्यश्रीताई बाळासाहेब सोनवणे अमरराव देशमुख, महादेव आदमाने जीवनराव गायकवाड, दीपकभैय्या शिंदे, धिमंत राष्ट्रपाल, अनंतराव अंजान, सुभाष घुंडरे , बालाजी मुळे, डिगांबर घुंडरे, बालासाहेब जोगदंड बी.एम.खाडे , महेश उजगरे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते युवराज नारायण भुंबे यांचा सेवापूर्ती निमित्ताने सपत्नीक हृद्य सन्मान करण्यात आला. सत्काराचे स्वरूप पुष्पहार, पुष्पगुच्छ व शाल असे होते. सुरूवातीला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तर प्रारंभी अक्षय भुंबे मित्र मंडळाच्या वतीने ही सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना खासदार बजरंगबप्पा सोनवणे (बीड लोकसभा) म्हणाले की, ३५ वर्षे देशसेवा केली आहे. केन्द्र व राज्य प्रशासनात दोन्ही ठिकाणी सेवा करणे हे भाग्य आहे. यामुळे त्यांच्या संपूर्ण निष्कलंक सेवाकार्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो अशा शब्दांत खासदार सोनवणे यांनी युवराज नारायण भुंबे यांचा गौरव केला. तर प्रमुख पाहुणे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी म्हणाले की, युवराज नारायण भुंबे यांच्या प्रकृतीकडे पाहिले तर असे कोणालाही वाटणार नाही की, ते ३५ वर्षे देशसेवा करून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना सदृढ, निरोगी दीर्घायुष्य लाभावे अशा सदिच्छा मोदी यांनी यावेळी व्यक्त

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी चिंचवड सुंदरतेने बहरतंय!

## महापालिकेचा 'वेस्ट टू वंडर' हा अभिनव प्रकल्प

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेकडून स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अंतर्गत स्वच्छता मोहीम, आर.आर.आर सेंटर, शून्य कचरा प्रकल्प, वेस्ट टू वंडर, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक जीवन शैलीचा स्वीकार, जनजागृती असे अनेक अभिनव प्रयोग राबविले जात आहेत.**

महापालिकेचा आरोग्य विभाग शहराच्या सौंदर्यात भर घालणारे उपक्रम सातत्याने राबवत आहे. त्यानुषंगाने अ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक १० अंतर्गत इंदिरानगर, नाना-नानी पार्क, मोरवाडी, म्हाडा कॉलनी, शिवनेरी सोसायटी, अजिंठानगर, सुमन मॉल तसेच एमआयडीसी रोडवरील किशोर पंप कंपनी परिसरात आरोग्य विभागामार्फत 'वेस्ट टू वंडर' हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला आहे.



या उपक्रमांतर्गत कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचा वापर करून परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. वापरात नसलेले पाईप, प्लास्टिकच्या बाटल्या, लाकूड, माठ, दगड आदी वस्तूंना कल्पकतेचा स्पर्श देत त्यातून आकर्षक कलाकृती तयार करण्यात आल्या आहेत. विविध रंगसंगती, रेखीव सजावट आणि भिंतींवरील अत्यंत कल्पकतेने रेखाटलेली चित्रांनी या परिसराचा संपूर्ण कायापालट केला आहे.

**सार्वजनिक जागेवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी तेथे स्वच्छता करून तो परिसर टाकाऊ वस्तूंचा वापर करून कल्पकतेने सजवण्याचा उपक्रम आरोग्य विभागाने हाती घेतला आहे. या अंतर्गत शहरातील विविध सार्वजनिक जागा स्वच्छ व सुंदर करण्यात येत आहेत. नागरिकांनी देखील सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता त्या जागांची स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेला सहकार्य करण्याची गरज आहे.**

**–विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

**पिंपरी चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सातत्याने विविध अभिनव उपक्रम राबवले जात असतात. वेस्ट टू वंडर ही संकल्पना अतिशय प्रभावीपणे राबवली जात असून स्वच्छतेबरोबर कलात्मकता व सुंदरता जपण्याचे काम आरोग्य विभागाकडून केले जात आहे.**

**–सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

एकेकाळी नागरिकांनी अस्ताव्यस्त टाकलेल्या कचऱ्याची जागा आता नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी 'अ' क्षेत्रीय सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक स्नेहा चांदणे, सहायक आरोग्य निरीक्षक कृष्णा राऊत तसेच, अन्य महापालिका कर्मचारी यांच्या प्रयत्नांमुळे कचऱ्यातून साकारलेली ही कला शहराच्या सौंदर्यात भर घालत आहे. वेस्ट टू वंडर या अनोख्या उपक्रमामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणे उजळून निघाली आहेत. हा प्रकल्प फक्त कचरा व्यवस्थापनापुरता मर्यादित न राहता, शहराच्या सौंदर्याचे प्रतीक बनत आहे.

# क्रांतिवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालयाला केरळच्या राज्यपालांची सदिच्छा भेट

पिंपरी-चिंचवडः चिंचवड येथील क्रांतिवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालयाला केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी शनिवारी (दि.११) सदिच्छा भेट दिली. त्यांनी चापेकर स्मारकाची पाहणी करत समितीच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्यपाल आर्लेकर यांचा चापेकर स्मारक समितीच्या वतीने सन्मानचिन्ह, शाल देऊन गौरव करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग कार्यवाह मुकुंदराव कुलकर्णी, जिल्हा कार्यवाह नरेंद्र पेंडसे, धर्म जागरण प्रमुख हेमंतराव हरहरे, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे कोषाध्यक्ष रवींद्र नामदे, सदस्य डॉ शकुंतला बन्सल, सुहास पोफळे, व्यवस्थापक अतुल आडे , मैथिली कुलकर्णी, सतिश अवचार, तसेच क्रांतिवीर चाफेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालयातील सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल राजेंद्र आर्लेकर म्हणाले, ''आम्ही इतिहासात जे वाचत होतो, ते आज प्रत्यक्षदर्शन आम्हाला घडले आहे. सुंदर अशा चापेकर वाड्यामध्ये परंपरा, संस्कृतीच्या अनेक छटा या पुन्हा बघण्यास मिळाल्या. चापेकर बंधूंनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान, त्याग याची छोटीशी झलक बघता आली. देशांतील तरूणांनी चिंचवडमध्ये येऊन चापेकरांच्या स्मृतींना अभिवादन करावे. प्रेरणा घेऊन भारत मातेच्या उत्कर्षासाठी कायम प्रयत्न करत रहावेत'', असे आवाहनही त्यांनी केले.



**केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांचा चापेकर स्मारक समितीच्या वतीने सन्मानचिन्ह, शाल देऊन गौरव करण्यात आला. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग कार्यवाह मुकुंदराव कुलकर्णी, जिल्हा कार्यवाह नरेंद्र पेंडसे, धर्म जागरण प्रमुख हेमंतराव हरहरे, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे कोषाध्यक्ष रवींद्र नामदे, सदस्य डॉ.शकुंतला बन्सल, सुहास पोफळे, मैथिली कुलकर्णी, सतिश अवचार, व्यवस्थापक अतुल आडे यावेळी उपस्थित होते.**

# पुरंदर तालुक्यात विकासाची गंगा आणणार - जालिंदर कामठे

सासवड । प्रतिनिधी

पुरंदर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकास साधून तालुक्याला पुणे जिल्ह्यात बारामतीनंतर एक नंबरवर आणण्याचा निर्धार पक्षाने व्यक्त केला आहे. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने पुरंदरचा विकास वेगाने होणार आहे, असे प्रतिपादन पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामठे यांनी केले.बोपगाव येथे एकूण ४२ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे होते.



कानिफनाथ रोड काँक्रीटीकरण १०.५० लाख, नांगरी आळी काँक्रीटीकरण १०.५० लाख, जगदाळे आळी काँक्रीटीकरण १०.५० लाख, कानिफनाथ मंदिर पालखी मार्गावर ब्लॉक बसवणे १०.५० लाख आशी ४२ लाख रुपयेयाची कामे करत आली. या सर्व कामांमुळे रस्ते दुरुस्ती मूलभूत सुविधा आणि सार्वजनिक सोयी-सुविधा सुधारणा होऊन गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

यावेळी कामठे म्हणाले, पुरंदर तालुक्यातील विकासाचा राहिलेला अनुशेष आता मिटवला जाईल. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विकासाची गंगा वाहणार आहे. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, अमित झेंडे, सरपंच सारिका गुरव, शालन फडतरे, ज्योती फडतरे, ग्रामसेवक राखी ढगारे, मारुतीभाऊ फडतरे, पकाभाऊ फडतरे, योगेश फडतरे, दयानंद फडतरे, संदीप फडतरे, साहेबराव फडतरे, बाळासाहेब फडतरे, रवींद्र फडतरे, बाळू पवार, अशोक फडतरे, सुरज फडतरे, राजेंद्र फडतरे, विजय जगदाळे, विजय फडतरे, शहाजी फडतरे, विश्वास फडतरे, नागेश फडतरे, दीपक फडतरे, दत्तात्रय फडतरे, बाप्पू फडतरे, कानिफनाथ फडतरे, शामराव फडतरे आदी उपस्थित होते.

# जुन्नरमधील अनधिकृत कत्तलखाने भूईसपाट करा

जुन्नर । प्रतिनिधी

शिवजन्मभूमी जुन्नर मधील पाच अनधिकृत आणि बेकायदेशीर कत्तल खाने तसेच शेड जुन्नर नगर परिषद, पोलीस, महसूल प्रशासनाने तातडीने भुईसपाट करावेत, असे निवेदन महाराष्ट्र शासन मानद पशु कल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी यांनी दिले आहे.

जुन्नर पोलीस ठाण्यामध्ये पोलीस निरीक्षक किरण अवचर, मुख्याधिकारी चरण कोल्हे, नायब तहसीलदार सारिका रासकर यांना या गंभीर व संवेदनशील विषयाबाबतचे निवेदन सादर करण्यात आले. याप्रसंगी गोरक्षक शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शिवनेरी गडावर छत्रपती शिवाजी राजांचा जन्म झालेल्या ठिकाणी जुन्नरमध्ये दररोज मोठ्या संख्येने गोवंशाची हत्या होत आहे. जुन्नर मधील बेकायदेशीर कत्तलखान्यात गोवंशाची कत्तल करून गोमांस पुण्या मुंबई सह इतर भागात पाठविले जात आहेत. या कत्तल खान्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी येत आहेत. याआधी शहरातील बेकायदेशीर कत्तलखान्यांवर पोलिसांनी छापा मारला असताना त्यांच्या वर हल्ला करण्यात आलेला होता.



मागील सात आठ दिवसांपूर्वी शहरातील माई मोहल्ला येथील बेकायदेशीर पत्राशेड मध्ये कत्तल करून ठेवलेले २००० किलो गोमांस तसेच कत्तलीसाठी आणलेल्या चार जिवंत गायी जुन्नर पोलिसांनी केलेल्या कारवाईत मिळून आले होते. २०२० मध्ये जुन्नर मधील १८ तसेच २०२४ मध्ये ५ अशा २३ बेकायदेशीर कट्टलखान्यांवर प्रशासनाने कारवाई करत ते उध्वस्त केले होते. आता नव्याने ५ बेकायदेशीर कत्तल खाने उभे करण्यात येऊन कायदा पायदळी तुडविला जात आहे. गोवंश हत्या बंदी कायदा पायमल्ली करीत राज्य मातेचा दर्जा असलेल्या गोमातेची हत्या करण्याचे काम शिवजन्मभूमीत बेकायदेशीर कत्तलखान्यात दररोज होत आहेत. यासाठी नव्याने तयार झालेले बेकायदेशीर पत्राशेड आणि कत्तलखाने प्रशासनाने भुईसपाट करण्याची आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे. निवेदनाच्या प्रति राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांनाही पाठविण्यात आलेल्या आहेत.

# पूरग्रस्तांना डब्ल्यू.एम.ओ. संस्थेकडून मदतीचा हात

पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी

डब्ल्यू.एम.ओ. संस्थेकडून माढा तालुक्यातील सुलतानपूर, निमगाव आणि वडशिंगे या गावांतील पूरग्रस्त कुटुंबांना मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आली.या मदत उपक्रमात २५० हून अधिक किराणा किट, २०० हून अधिक साड्या, लहान मुलांसाठी शालेय साहित्य व कपडे, पुरुषांसाठी शर्ट-पॅन्ट, तसेच एक वर्षाखालील बालकांसाठी पाळणे व गाद्या वाटप करण्यात आले.



यावेळी सलोनी नरवडे, अनिकेत जरे, रवी जाधव, सुभाष पालेकर, चेतन गोळे, विजय साळेकर, स्थानिक ग्रामस्थ, माजी सरपंच अनिल शिंदे, गोरक्ष शिंदे, प्रशांत जाधव उपस्थित होते.

सलोनी नरवडे यांनी सांगितले, पूरग्रस्त नागरिकांच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी ही मदत थोडासा आधार ठरावी, ही आमची मनापासून इच्छा आहे. समाजातील प्रत्येकाने अशा वेळी पुढाकार घेऊन माणुसकी जपावी.

रवी जाधव यांनी सांगितले, पूरग्रस्त भागातील लोकांनी मोठ्या संकटाचा सामना केला आहे. त्यांच्या चेहऱ्यावर थोडं हसू आणता आलं, हीच आमच्यासाठी मोठी समाधानाची बाब आहे. संस्थेचे कार्य हे केवळ मदत नाही, तर माणुसकीची सेवा आहे.

# निंबाळकरवाडीत बेवारस पुरुषाचा मृतदेह आढळला

**पुणे । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत निंबाळकरवाडी परिसरात एका पुरुषाचा बेवारस मृतदेह आढळून आला आहे. साधारणतः चार दिवसांपूर्वीचा हा मृतदेह असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निंबाळकरवाडी, कात्रज येथील सर्वे क्रमांक १२, हिस्सा क्रमांक १ या प्लॉटच्या बाजूच्या उतारावर गवतामध्ये एक पुरुष जातीचे प्रेत आढळले. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून, अंगात शर्ट नव्हता, काळी जीन्स पॅन्ट परिधान केलेली होती. उजव्या गुडघ्यावर फाटलेली पॅन्ट, उजव्या हातात स्टीलचे कडे व धागा होता.

प्राथमिक तपासात मृतदेहावर कोणत्याही प्रकारच्या मारहाणीच्या किंवा गंभीर जखमांच्या खुणा आढळल्या नाहीत. घटनेचा पंचनामा करण्यात आला असून मृतदेह पुढील तपासासाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. घटनास्थळी उप आयुक्त मिलिंद मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल आवारे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल खिलारे, सहायक पोलीस निरीक्षक समीर शेंडे, उप निरीक्षक निलेश मोकाशी आदी अधिकाऱ्यांनी भेट दिली. भारती विद्यापीठ पोलिसांकडून पुढील कायदेशीर तपास सुरू आहे.

# मांजरवाडी येथे सलग तिसरी तर नारायणगाव येथील औटी मळ्यात एक बिबट मादी जेरबंद

ओझर । प्रतिनिधी

मांजरवाडी (ता. जुन्नर )परिसरात तिसरी बिबट मादी गुरुवार दि ९ ऑक्टोबर रोजी मांजरवाडी व जाधववाडी च्या सीमेवर अशोक टेमगिरे यांच्या बटाट्याच्या शेतामध्ये लावलेल्या पिंजऱ्यामध्ये जेरबंद करण्यात आली असून ती दीड वर्षाची आहे. तर नारायणगाव येथील औटी मळ्यात सुभाष चंद्रसेन औटी यांच्या घराजवळ धुमाकूळ घालणारी मादी उमेश डेरे यांच्या सिताफळ बागेत बिबट वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यामध्ये शनिवार दि ११ रोजी जेरबंद करण्यात जुन्नर वनविभागाला यश आले आहे. जुन्नर उपवनसंरक्षक प्रशांत खाडे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हे पिंजरे त्या ठिकाणी लावण्यात आले होते.



मांजरवाडी या ठिकाणी वन विभागाने यापूर्वी सलग दोन बिबट मादी जेरबंद केले असून पकडण्यात आलेली ही तिसरी बिबट मादी आहे. दरम्यान,नारायणगाव येथील औटी मळ्यात उमेश डेरे,सुभाष औटी, ग्रामपंचायत सदस्य भागेश्वर डेरे महेश डेरे यांनी या ठिकाणी पिंजरा लावण्याची मागणी केली होती. काही दिवसापूर्वी या ठिकाणीच सी सी टी व्ही मध्ये बिबट्या कैद झाला होता. पकडण्यात आलेल्या या दोन्ही बिबट मादीला बिबट निवारण केंद्र येथे नेण्याकरिता रेस्क्यू टीम सदस्य तुषार टेके, रामकृष्ण चोपडा, पोलीस पाटील सचिन टावरे, आपदा मित्र सुशांत भुजबळ, आदित्य डेरे,शंतनू डेरे, ग्राम पंचायत सदस्य उदय खंडागळे यांनी मदत केली.नागरिकांनी या भागांमध्ये सतर्क रहावे रात्रीच्या वेळेस काळजी घ्यावी

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त रंगला सुरेल जल्लोष!

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम रंगला. प्रशासनातील जबाबदारीसोबतच कलाविष्काराची जाण असलेल्या महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या गायनकौशल्याने रसिकांना मंत्रमुग्ध केले.**



महापालिका अधिकारी-कर्मचारी प्रस्तुत गीतगायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यासाठी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह आयुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता मनोज सेठीया, उपायुक्त पंकज पाटील, सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सादर करण्यात आलेल्या मराठी आणि हिंदी गीतांच्या सुरेल सादरीकरणांनी वातावरण भारावून गेले. प्रत्येक सादरीकरणातून भाव, अभिव्यक्ती आणि ताल यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. काही गाणी हृदयस्पर्शी तर काही उत्साही ठरली. काही गाण्यांनी अध्यात्माची छटा निर्माण केली, तर काहींनी आनंदाचा जल्लोष उधळला. महापालिकेतील विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांच्या सादरीकरणातून ' संगीत आणि गायन कला' यांचा सुरेख मिलाफ जाणवला. आपल्या दैनंदिन कार्यात प्रामाणिकपणे झटणारे हे अधिकारी-कर्मचारी जेव्हा रंगमंचावर उभे राहिले, तेव्हा त्यांच्यातील कलाकाराने प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमाने केवळ मनोरंजनच नव्हे, तर आपुलकी, एकता आणि सामूहिकतेचा भाव अधिक दृढ केला.४३ व्या वर्धापन दिनाचा हा सुरेल जल्लोष पिंपरी चिंचवडच्या सांस्कृतिक संवेदनांना नवचैतन्य देणारा ठरला. सह शहर अभियंता मनोज सेठीया यांनी संयोजन केलेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि उपअभियंता किरण अंदुरे यांनी केले.

# ब्युटी पार्लरमध्ये काम लावण्याचे आमिष दाखवून वेश्या व्यवसायास प्रवृत्त; दोन तरुणींची सुटका, आरोपीला अटक

पुणे । प्रतिनिधी

ब्युटी पार्लरमध्ये काम लावण्याचे आमिष दाखवून पश्चिम बंगालहून पुण्यात आणून वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या दलालाला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी पश्चिम बंगालमधी दोन तरुणींची सुटका केली. दोन वर्ष छळ सहन केल्यानंतर संधी मिळाल्यावर तरुणींनी पोलीस नियंत्रण कक्षाला दूरध्वनी केला. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकून दोन तरुणींची सुटका केली.



राजू चिद्रवार-पाटील (वय २५, रा. आंबेगाव पठार, धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्या दलालाचे नाव आहे. त्याची पत्नी मीरा हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, ती पसार झाली आहे. याबाबत एका २२ वर्षाच्या तरुणीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी राजू चिद्रवार आणि त्याची पत्नी मीरा यांनी पश्चिम बंगालमधील दोन तरुणींना पुण्यात ब्युटी पार्लरमध्ये काम लावून देते, असे आमिष दाखविले.

दोघींना पश्चिम बंगालमधील गावाहून पुण्यात आले. ब्युटी पार्लरमध्ये कामाला न लावता तरुणींना वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. दोघींनी नकार दिल्यानंतर त्यांना डांबून ठेवले. त्यांना धमकावून शिवीगाळ केली. मारहाण करुन छळ केला, तसेच त्यांना उपाशी ठेवले. दोघींना वेश्याव्यवसायास प्रवृत्त करुन त्यांच्याकडून आरोपी पैसे घेत होते. गेल्या आठवड्यात आंबेगाव पठार भागात एका तरुणीला त्यांनी आणले. तिलाही वेश्याव्यवसायास प्रवृत्त केली. या तरुणीने संधी साधून मोबाइल क्रमांकावरुन पुणे पोलिसंच्या नियंत्रण कक्षात संपर्क साधला. त्यानंतर भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार खिलारे यांनी तपास पथकाला तरुणीचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोलिसंनी छापा टाकून आरोपी चिद्रवारच्या ताब्यातून फिर्यादी तरुणीसह दोघींची सुटका केली. पोलीस निरीक्षक खिलारे तपास करत आहेत.